नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८


संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची आज जयंती



* वर्ष ५१ * अंक १३१ * * अमरावती * शुक्रवार, दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

खरीखरी..

## निवडून येईल त्याला सलाम!

आज बिहार विधानसभा निवडणुकीचा निकाल आहे. त्यामध्ये कोणाचा निकाल लागतो आणि कोणाला राजगादी मिळणार आहे हे ठरेल. गेल्या वेळी दीड ते पाऊण टक्के मतदानाचा फरक असल्याने तसेच काँग्रेसचे प्रदर्शन अपेक्षेप्रमाणे न झाल्यामुळे राजदच्या हातून सत्ता गेली. यावेळी मतदानाचे जे आकडे आले आहेत. त्यावरून पूर्वीपेक्षा जास्त मतांमध्ये अंतर राहणार आहे हे नक्कीच. एनडीए आणि इंडिया यांनी एकमेकांच्या विरोधात ही निवडणूक एकजुटीने लढवली होती. अनेक दिवसांपासून नितीश कुमार आजारी आहेत, त्यांची तब्येत बरोबर नाही. त्यांना काहीतरी गंभीर आजार आहे. अशा बातम्या मुद्दाम पेरण्यात आल्या. यावेळी आपलाच मुख्यमंत्री होईल असा भारतीय जनता पक्षाचा दावा होता. पण एकूण नितीश कुमार यांची देहबोली पाहता ते ज्या प्रकारे आपल्या पक्षाच्या कार्यालयात आज फेरफटका मारून आले. त्यावरून त्यांच्या तब्येतीची अफवा हवेत उडून गेलेली आहे. मतदानाचा टक्का वाढल्याने इंडिया आघाडीला आपण हमखास विजयी होऊ असा त्यांचा तेजस्वी दावा आहे, त्यांनी १८ तारखेचा मुहूर्त सुद्धा काढून ठेवलेला आहे. आता भारतीय जनता पक्षा तर्फेही नितीश कुमारच मुख्यमंत्री होते असे सांगण्यात येत आहे. पण थेंबाने गेलेली गेलेली इज्जत हौद भरूनही परत येत नसते. या निवडणुकीमध्ये नितीश कुमारांची मते भाजपकडे किती वळ्ली याचाही अंदाज घेतला पाहिजे. कारण, निवडणुकीच्या प्रचारात तेजस्वी यादव यांनी नितीश कुमार विरुद्ध एकही शब्द काढला नव्हता, हेही लक्षात ठेवले पाहिजे. आपले पंतप्रधान यांच्यासह सगळेच भाजपवाले जंगल राज्यची आठवण करत होते हे महत्त्वाचे आहे. नितीश कुमार यांनीही तेजस्वी विरुद्ध त्याचवेळी एकही ओळीचे वक्तव्य केलेले नव्हते. यावरून निकाल लागल्यावर सुद्धा भाजपला मुख्यमंत्री पदाचे मांडेच खावे लागतील असे दिसते. त्याहूनही जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे की, जर अटीतटीची लढत झाली आणि एनडीए मध्ये दोन-चार आमदार कमी पडले तर त्याची व्यवस्था करणारे अनेक चाणक्य भारतीय जनता पक्षामध्ये आहेतच मात्र, तसे होऊ नये म्हणून तेजस्वी कडील सर्व आमदार उद्याच्या उद्या ममता दीदींच्या बंगालात पाठवण्यात येणार आहेत. काँग्रेसचे आमदार आजकाल नेहमीच फुटतात त्यामुळे काँग्रेसच्या आमदारांनाही डायरेक्ट विमानतळावर बोलवण्यात आलेले आहे. त्यांची रवानगी बहुधा तेलंगणा किंवा कर्नाटक राज्यांमध्ये होऊ शकते. छोट्या पक्षांच्या आमदारांचीही व्यवस्था करण्याची तयारी दोन्ही आघाड्यांना करावी लागेल. २०१४ च्या गोव्याच्या निवडणुकीत काँग्रेसकडून दिग्विजय सिंह गेले आणि तिथे ते झोपा काढत राहिले त्यामुळेच नितीन गडकरींनी काँग्रेसचे चार आमदार एनडीएकडे वळवले होते. बिहारच्या या निवडणुकीत एक बाब मात्र पक्की आहे की क्रमांक एक वर तेजस्वी, क्रमांक दोनवर नितीश कुमार राहणार आहेत. दोन्ही राष्ट्रीय पक्षांना या राज्यात मुख्यमंत्र्याची किंवा मुख्यमंत्री पदाची अपेक्षा करता येणार नाही याची व्यवस्था जदयूचे काका आणि राजदचे पुतणे यांनी करून ठेवलेली आहे. आमचे हे शब्द किती प्रत्यक्षात उतरतात हे आम्हाला पाहायचे आहे. शेवटी काय आहे तर जे निवडून येतील, त्यांना आमची जनता सलाम करत असते.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## पुण्यात नवले ब्रीजवर भीषण अपघात
# ट्रकच्या धडकीत ९ जणांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १३ :

पुणे येथील नवले पुलावर दोन ते तीन वाहनांनी पेट घेतल्याची एक भीषण अपघात घटना घडली आहे, ज्यात ८ जणांचा मृत्यू झाला असून २० जण जखमी झाल्याचे समजते. या दुर्घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली, तसेच अग्निशमन दलाच्या गाड्याही नवले पुलावर तातडीने पोहोचल्या.

अपघातातील सर्व जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, या दुर्घटनेतील मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

साताऱ्याच्या दिशेने पुण्याकडे येणाऱ्या दोन्ही ट्रकचा अपघात झाला आणि यात एक कार अडकली होती. यावेळी दोन्ही ट्रकला आग लागली असून यात मृतांची संख्या देखील वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच या अपघातामुळे नवले ब्रिजवर मोठी वाहतूक कोंडी झाल्याचे पाहायला मिळत आहे.

अग्निशमन दलाकडून ट्रकला लागलेल्या आग विझवण्याचे प्रयत्न करत असून यावेळी नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. नवले पुलावर अनेक अपघात होत असतात, परंतु हा अपघात सर्वात मोठा असल्याचे बोलले जात आहे. दोन ट्रकचा अपघात झाला असून यात मागच्या ट्रकचा चालक अद्यापही ट्रकमध्येच अडकला असल्याचे दिसून येत आहे. तर सध्या या अपघातात अडकलेल्या मृतदेहांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. चारचाकी जी या दोन्ही ट्रकच्या मध्ये अडकली होती, या कारमधील प्रवाशांचा आगीत होरपळून मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, एका कंटेनरचा ब्रेक फेल झालेला होता आणि त्या कंटेनरने पुढच्या ट्रकला धडक दिली. मध्ये एक कार होती, त्यात ४-५ लोक होती, ती संपूर्णपणे जळून खाक झाली आहेत. ट्रक चालक देखील ट्रकमध्येच अडकले असून त्यांना देखील आगीमुळे उतरता आले नाही.

त्यांचा सुद्धा मृत्यू झाला आहे. तसेच मागे एक ट्रॅव्हलर होती, त्याला सुद्धा धडक देण्यात आली, त्यात १७-१८ लोक होती. जवळपास २०-२५ लोक जखमी असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्या कंटेनरचा ब्रेक फेल झाला होता, त्या ट्रकने २०-२५ वाहनांना धडक दिली आहे. पंचनामा सुरू असून पुढील कारवाई करण्यात येत आहे.



### अपघातातील मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक सहाय्य : मुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस म्हणाले, पुण्यातील नवले पुलावर झालेल्या अपघातात काही लोकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आणि वेदनादायी आहे. या घटनेत प्राण गमावलेल्या व्यक्तींना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. या अपघातातील मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

## श्रीनगर ते पुलवामा थरार
### ५०० ठिकाणी छापे, ६०० जण ताब्यात

■ वृत्तसंस्था, जम्मू, दि. १३ :

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या कार बॉम्बस्फोटानंतर संपूर्ण देशभरात सुरक्षा एजन्सी अलर्ट झाल्या आहेत. या स्फोटाचा धागा जम्मू-काश्मीरशी जोडला गेल्याचं समोर आलं असून, तिथे मोठ्या प्रमाणावर संशयितांचा शोध सुरू आहे. स्फोटानंतर जम्मू-काश्मीर पोलिसांनी तब्बल ५०० ठिकाणी धाडी टाकल्या असून ६०० जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. या कारवाईचं मुख्य लक्ष्य जमात-ए-इस्लामी (जेआय) या बंदी घातलेल्या संघटनेवर केंद्रित आहे. सुरक्षा यंत्रणांना अशी माहिती मिळाली होती की ही संघटना पुन्हा सक्रिय होत असून, दहशतवादी नेटवर्क उभं करण्याच्या तयारीत आहे. त्यानंतर तात्काळ मोठ्या प्रमाणावर छापे टाकण्याचं अभियान राबवण्यात आलं. श्रीनगर, पुलवामा, कुलगाम, शोपियान आणि बारामुल्ला अशा अनेक संवेदनशील जिल्ह्यांमध्ये ही कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान, "डॉक्टर मॉड्यूल" नावाच्या दहशतवादी गटावरही कारवाई झाली असून, तीन सरकारी कर्मचाऱ्यांसह दहा जणांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलं आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, अनंतनाग, पुलवामा आणि कुलगाम येथे रात्रीच्या छाप्यांदरम्यान हे संशयित पकडले गेले. लाल किल्ल्याजवळ सोमवारी झालेल्या भीषण स्फोटात आतापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाला आहे.

या प्रकरणाच्या तपासात उघड झालं आहे की काही आरोपी गेल्या वर्षी तुर्कीला प्रवास करून आले होते. स्फोटकांचा मोठा साठा जप्त करण्यात आला असून, या प्रकरणात डॉक्टरांसह सात जणांना अटक करण्यात आली आहे. तपास यंत्रणांनी आतापर्यंत "व्हाईट कॉलर टेररिस्ट" या नेटवर्कशी संबंधित २०० हून अधिक लोकांची चौकशी केली आहे.

## शरद पवारांच्या 'तुतारी' चिन्हाचे संकट टळले
# 'पिपाणी' चिन्ह कायमस्वरूपी रद्दबातल

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १३ :

अजित पवार यांच्या बंडानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट पडले. यामध्ये अजित पवार यांच्या गटाला 'घड्याळ' हे मूळ चिन्ह मिळाले, तर शरद पवार यांच्या गटाला 'तुतारी वाजवणारा माणूस' हे चिन्ह देण्यात आले. मात्र, अपक्ष उमेदवारांना मिळणाऱ्या 'पिपाणी' या साधर्म्य असणाऱ्या चिन्हामुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीला दोन निवडणुकांमध्ये मोठा दणका बसला. याच पार्श्वभूमीवर, आता निवडणूक आयोगाने अपक्षांसाठी असलेले हे 'पिपाणी' चिन्ह कायमस्वरूपी रद्दबातल केले आहे.



निवडणूक आयोगाने घेतलेल्या या निर्णयावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी आनंद व्यक्त करतानाच निवडणूक आयोगाला खोचक टोला लगावला. शिंदे यांनी ट्विट करत, तुतारी चिन्हाशी साधर्म्य असलेले पिपाणी चिन्ह कायमचे वगळल्याबद्दल आयोगाचे आभार मानले आहेत. पण त्याच वेळी, झालेल्या नुकसानीचा संदर्भ देत त्यांनी निवडणूक आयोगाला खडे बोल सुद्धा सुनावले आहेत.

शशिकांत शिंदे ट्विट करत म्हणाले, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत या चिन्हामुळे कार्यकर्त्यांना आणि मतदारांना मोठा गोंधळ निर्माण झाला, त्याची राजकीय किंमत पक्षाला चुकवावी लागली होती. हा निर्णय जर आधीच घेतला गेला असता, तर आज महाराष्ट्रातील आणि देशातील राजकीय चित्र नक्कीच वेगळे असते. शेवटी, उशिरा सुचलेले शहाणपण असे याला म्हणावे लागेल. निवडणूक चिन्हातून पिपाणी (ट्रम्पेट) हे चिन्ह कायमचे वगळल्याबद्दल निवडणूक आयोगाचे आभार! हा निर्णय लोकशाही आणि स्वच्छ निवडणूक प्रक्रियेसाठी एक सकारात्मक पाऊल आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळालेले 'तुतारी वाजवणारा माणूस' हे चिन्ह आणि अपक्ष उमेदवारांना दिलेले 'पिपाणी' हे चिन्ह यांच्यातील साधर्म्यामुळे मतदारांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला होता. या चिन्हांमधील साधर्म्यामुळे लोकसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवारांना मोठ्या प्रमाणावर मते मिळाली आणि थेट निवडणुकीच्या निकालावर त्याचा परिणाम दिसून आला.

## हरियाणामध्ये तिसरी संशयित कार सापडली
# बॉम्ब शोध पथकाकडून तपास

■ वृत्तसंस्था, फरिदाबाद, दि. १३ :

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ कार स्फोट घडवणारा दहशतवादी डॉ. उमर उन नबी याच्या मालकीच्या इको स्पोर्ट्स कारच्या तपासात असे दिसून आले आहे की, ती स्फोटके वाहून नेण्यासाठी वापरली जात होती. कारच्या फॉरेन्सिक चाचणीत काही सुगावे सापडले आहेत.

ही कार दोन दिवसांपासून फरिदाबादमधील खंडावली गावात पार्क केली होती. बुधवारी संध्याकाळपासून दिल्लीतील एनआयए आणि एनएसजी पथके या घटनेचा तपास करत होती. पोलिसांनी तिथे कार पार्क करणाऱ्या फहीमला अटक केली आहे.


फहीम हा अल-फलाह विद्यापीठात संगणक ऑपरेटर आहे आणि दहशतवादी डॉ. उमरचा सहाय्यक आहे. फहीमची बहीण तिथे राहते, म्हणून त्याने मंगळवारी रात्री तिथेच त्याची कार पार्क केली आणि निघून गेला. कार सापडल्यानंतर, जवळपासची घरे रिकामी करण्यात आली आणि २०० मीटरचा परिसर सील करण्यात आला. फरीदाबादच्या खंडावली गावात उभी असलेली लाल इकोस्पोर्ट कार आणि दिल्लीहून सीएफएसएलची टीम तपासासाठी पोहोचली. फरीदाबादच्या खंडावली गावात उभी असलेली लाल इकोस्पोर्ट कार आणि दिल्लीहून सीएफएसएलची टीम तपासासाठी पोहोचली.

दरम्यान, पोलिसांनी फरीदाबाद येथून या मॉड्यूलशी जोडलेली तिसरी ब्रेझा कार जप्त केली आहे. ती अल-फलाह विद्यापीठाच्या आतून जप्त करण्यात आली आहे. ही कार महिला दहशतवादी डॉ. शाहीनच्या नावावर असल्याचे वृत्त आहे. हरियाणा पोलिसांचे बॉम्ब शोध पथक कारची चौकशी करत आहे. या प्रकरणाशी संबंधित चौथी स्विफ्ट डिझायर कार देखील पोलिस शोधत आहेत.

स्फोटके विकल्याच्या संशयावरून केंद्रीय सुरक्षा संस्थांनी गुरुग्राम, फरीदाबाद आणि नूह येथील खत विक्रेत्यांच्या दुकानांवर छापे टाकले. नूहमध्ये एका खत विक्रेत्याला ताब्यात घेण्यात आले.

# अशी शिक्षा देऊ की जग पाहत राहील
## दिल्ली धमाक्यावर अमित शहांचा कडक इशारा

■ वृत्तसंस्था, गांधीनगर, दि. १३ :



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिल्ली लाल किल्ला स्फोटाबाबत कडक इशारा दिला आहे. त्यांनी सांगितले की या स्फोटातील गुन्हेगारांना देण्यात आलेली शिक्षा इतकी कठोर असेल की संपूर्ण जग ते पाहेल आणि भविष्यात देशात असा हल्ला करण्याची हिंमत कोणीही करणार नाही. गुजरातमधील मोतीभाई चौधरी सागर सैनिक शाळेत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आयोजित कार्यक्रमात अमित शाह यांनी ही टिप्पणी केली. अशा घटनांविरुद्ध शून्य सहनशीलतेचे धोरण स्वीकारले जाईल यावर त्यांनी भर दिला.

सोमवारी संध्याकाळी लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ एका संथ गतीने चालणाऱ्या ह्युंदाई कारमध्ये मोठा स्फोट झाला. त्यात बारा जण ठार झाले आणि अनेक जण जखमी झाले. स्फोटाची तीव्रता इतकी तीव्र होती की जवळपासच्या अनेक वाहनांचेही मोठे नुकसान झाले, ज्यामुळे परिसरात मोठी नासधूस झाली. तपास यंत्रणा सध्या या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## अल-कायदाचा दहशतवादी कट
# ५ राज्यांमध्ये छापे

■ वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. १३ :

कायदाने गुजरातमध्ये बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांना सामील करून रचलेल्या दहशतवादी कटाच्या संदर्भात एनआयएने पाच राज्यांमध्ये सुमारे १० ठिकाणी छापे टाकले आहेत. केंद्रीय संस्थेच्या प्रवक्त्याने एका निवेदनात म्हटले आहे की एनआयएच्या पथकांनी पश्चिम बंगाल, त्रिपुरा, मेघालय, हरियाणा आणि गुजरातमधील अनेक संशयित आणि त्यांच्या सहकाऱ्यांशी संबंधित ठिकाणांवर छापे टाकले.

अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, अनेक डिजिटल उपकरणे आणि कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत आणि फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आली आहेत. त्यांनी पुढे सांगितले की हा खटला २०२३ मध्ये दाखल करण्यात आला होता आणि या प्रकरणाच्या केंद्रस्थानी चार बांगलादेशी नागरिक आहेत. त्यांची ओळख मोहम्मद सोजिबमियान, मुन्ना खालिद अन्सारी, अझरुल इस्लाम आणि अब्दुल लतीफ अशी झाली आहे.

## अजित पवारांवर सत्ता सोडण्याची वेळ आणली जाईल
# काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांचा दावा

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १३ :

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर भाजपकडून सत्तेतून बाहेर पडण्याची वेळ आणली जाईल, असा दावा काँग्रेसचे विधिमंडळ नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांनी पार्थ पवार भूखंड घोटाळ्यात अजित पवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सरकार बाहेर पडण्याचा इशारा दिल्याचा दावा केला आहे.या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी वरील दावा केला आहे. ते म्हणाले, पुण्यातील जमीन घोटाळ्यात पार्थ पवार जबाबदार आहेत. निवडणुकीच्या तोंडावर हा घोटाळा बाहेर काढून भाजपने या प्रकरणी अजित पवार व त्यांच्या पक्षाची कोंडी केली आहे.



या माध्यमातून आगामी निवडणुकीत पुणे, पिंपरी चिंचवड, सातारा, सांगली व मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत राष्ट्रवादी काँग्रेसने भाजपपुरक भूमिका घ्यावी असा डाव आहे. ते म्हणाले, स्थानिकच्या निवडणुकीत उमेदवारांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया अत्यंत किचकट ठेवण्यात आली आहे. उमदेवारी अर्ज २० पानांचा आहे. हा अर्ज ऑनलाईन भरताना विविध अडचणी येत आहेत.

# सिंहस्थ कामाचे विधिवत पूजा करून भूमिपूजन
## नाशिकचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा अधिक तेजस्वी होईल : मुख्यमंत्री फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. १३ :

येत्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे आणि नाशिक महानगरपालिका तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने होणाऱ्या नाशिक शहरातील पाच हजार ६५७ कोटी ८९ लाख रुपये खर्चाच्या विकासकामांचे भूमीपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. सिंहस्थ कुंभमेळ्याची कामे दर्जेदार आणि पारदर्शक पद्धतीने करून नाशिकला सुंदर आणि आधुनिक शहर करणार, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

ठक्कर मैदान येथे आयोजित या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कुंभमेळा मंत्री गिरीष महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, क्रीडा मंत्री माणिकाराव कोकाटे, खासदार राजाभाऊ वाजे, खासदार शोभा बच्छाव, मुख्य सचिव राजेशकुमार व नगर विकास विभागाचे अपर सचिव गोविंदराज (दूरदृष्यप्रणालीद्वारे), जिल्ह्याचे पालक सचिव एकनाथ डवले, नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.प्रविण गेडाम, आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते.




मागील कुंभमेळ्याचे चांगले आयोजन करण्यात आल्याचे नमूद करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, यावेळी कुंभमेळ्यात गतवेळेपेक्षा पाचपट अधिक भाविक येण्याची शक्यता आहे. भाविकांची व्यवस्था, सुरक्षा, पर्वस्नान व अमृतस्नानाचे नियोजन आणि या सोहळ्याचा मुळ गाभा असलेल्या आध्यात्मिकतेचा अनुभव भाविकांना देण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी नाशिकमध्ये केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून २० हजार कोटीपेक्षा अधिकची कामे सुरू करण्यात येत आहेत. कुंभमेळ्यापर्यंत ही रक्कम २५ हजार कोटींपर्यंत पोहोचण्याची शक्यता असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा उभ्या राहतील. शासनाच्या सर्व विभागांनी समन्वयाने कामे केल्याने मोठ्या प्रमाणात कामाला सुरूवात होत आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या नागरिकांनीही यासाठी सहकार्य केले आहे, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, कुंभमेळ्यासाठी रस्ते, महामार्ग दुरूस्ती, पिण्याच्या पाण्याची योजना, गोदावरीचे पावित्र्य राखणे, चांगल्या घाटांची निर्मिती, जुन्या मंदिरांचे पुनरुज्जीवन, विकासकामे करतांना गोदाघाटाचे पुरातन रुप कायम ठेवणे यावर भर देण्यात येत आहे. नाशिक हे महत्वाचे तीर्थक्षेत्र असल्याने इथे होणारी विकासकामे पुढील २५ वर्ष टिकली पाहिजे आणि नाशिक पर्यटनक्षेत्र म्हणून विकसीत व्हावे असा प्रयत्न या माध्यमातून होत आहे. या विकासकामांच्या माध्यमातून नाशिकचे रुप बदलेल आणि शहराच्या सर्वांगिण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कुंभमेळ्यात भाविकांचे व्यवस्थापन व्हावे यासाठी बाह्य वर्तुळाकार मार्ग तयार होत असून भविष्यातल्या नाशिकसाठी याचा फायदा होणार आहे. नाशिक विमानतळावर नवीन टर्मिनल इमारत, रेल्वे सुविधा, बस स्थानकाची सुविधा, स्मार्ट सीसीटीव्ही यंत्रणेच्या माध्यमातून आधुनिक नाशिक शहर विकसीत करण्यावर भर देण्यात येत आहे. एकूण बाराशे एकर जागा अधिग्रहीत करून त्यावर कुंभाचे आयोजन करण्यात येत आहे. भविष्यातही कुंभच्या आयोजनात कुठलीही अडचण राहणार नाही असा प्रयत्न आहे.

कुंभमेळ्याची ही सर्व कामे पारदर्शी पद्धतीने होतील अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली. विकासकामे करतांना नागरिकांचे नुकसान होऊ देणार नाही, तथापि सामाजिक कार्य समजून नागरिकांनीही विकासकामांना सहकार्य करावे. साधूसंतांनी शासनाला कुंभमेळा आयोजनासाठी मार्गदर्शन करावे, त्यांचे मार्गदर्शन महत्वाचे आहे, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

## सुरक्षादलांसह मुठभेडीत
# ६ नक्षलवादी ठार

■ वृत्तसंस्था, बिजापूर, दि. १३ :

छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत सहा नक्षलवादी ठार झाले. घटनास्थळावरून सुरक्षा दलांनी मोठ्या प्रमाणात शस्त्रेही जप्त केली. या चकमकीची माहिती देताना बस्तरचे आयजी पी. सुंदरराज म्हणाले की, नक्षलवाद्यांशी एकापेक्षा जास्त चकमकी झाल्या आहेत. ही चकमक ११ नोव्हेंबरपासून सुरू झाली. नक्षलवाद्यांकडून एके-४७, एलएमजी आणि आयएनएएसएएस रायफल जप्त करण्यात आल्या आहेत.

बस्तर आयजी म्हणाले, "११ नोव्हेंबर रोजी, बिजापूर जिल्ह्यात सीपी माओवादी संघटनेच्या उपस्थितीच्या संशयावरून, बिजापूर डीआरजी, दंतेवाडा डीआरजी, एसटीएफ आणि इतर सुरक्षा दलांनी एक ऑपरेशन सुरू केले. ऑपरेशन दरम्यान, सुरक्षा दल आणि माओवाद्यांमध्ये अनेक चकमकी झाल्या. चकमकीनंतर, सुरक्षा दलांनी घटनास्थळावरून तीन महिला माओवाद्यांसह सहा माओवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतले. माओवाद्यांमध्ये केंद्रीय क्षेत्र समितीचे प्रभारी विभागीय समिती सदस्य कन्ना आणि इतर क्षेत्र समिती सदस्य जगत आणि इतर पक्ष सदस्य मंगली आणि भगत यांचा समावेश आहे. अशा प्रकारे, एकूण सहा माओवाद्यांची ओळख पटली आहे. सुरक्षा दलांनी एके-४७, एलएमजी आणि इन्सास रायफलसह मोठ्या प्रमाणात शस्त्रे जप्त केली आहेत.

# तुकाराम विरुद्ध महाराष्ट्र खटल्यात सुप्रीम कोर्ट अपयशी



■ **मुंबई :** १९७९ च्या तुकाराम विरुद्ध महाराष्ट्र राज्य खटल्यात पीडित तरुणीच्या सन्मानाचे संरक्षण करणे सुप्रीम कोर्टाचे कर्तव्य होते. पण कोर्ट त्या पीडितेच्या सन्मानाचे रक्षण करण्यात अपयशी ठरले, अशी खंत सरन्यायाधीश बी आर गवई यांनी एका कार्यक्रमात बोलताना व्यक्त केली.

इंडिया इंटरनॅशनल सेंटर येथे आयोजित ३० व्या न्यायमूर्ती सुनंदा भंडारे स्मृती व्याख्यानात बोलताना सरन्यायाधीश बी आर गवई यांनी उपरोक्त खटल्यावर भाष्य करताना खंत व्यक्त केली. तुकाराम विरुद्ध महाराष्ट्र राज्य, १९७९ नामक या प्रकरणात एका तरुण आदिवासी मुलीवर पोलिस ठाण्यात बलात्कार करण्यात आला होता. कोर्टाने या प्रकरणी २ पोलिसांची निर्दोष सुटका केली होती.

सरन्यायाधीश म्हणाले, प्रस्तुत निर्णय भारताच्या घटनात्मक व न्यायिक इतिहासातील सर्वात वेदनादायी क्षणांपैकी एक आहे. तो संस्थात्मकदृष्ट्या लाजिरवाणा प्रसंग होता. १९७५ नंतर राष्ट्रीय पातळीवर लिंग समानतेवर चर्चा औपचारिक हक्कांच्या प्रश्नांच्या पलीकडे होत होती. ती समानतेचा अविभाज्य घटक म्हणून प्रतिष्ठेच्या सखोल कल्पनेकडे वळली. पुढे ही चर्चा कायदेशीर समानतेपासून महिलांच्या स्वायत्तता व शारीरिक अखंडता व त्यांच्या जीवनातील अनुभवनांना आकार देणाऱ्या सामाजिक वास्तवांच्या मान्यतेकडे वळली. या परिवर्तनातील एक निर्णायक क्षण शोकांतिका व संस्थात्मक अपयशातून जन्माला आला. माझ्या मते, हा निर्णय भारताच्या घटनात्मक व न्यायिक इतिहासातील सर्वात वेदनादायी क्षणांपैकी एक आहे. मी त्याला संस्थात्मकदृष्ट्या लाजिरवाणा प्रसंग म्हणतो. जिथे कायदेशीर व्यवस्था ज्या पीडितेचे रक्षण करण्यासाठी होती, ती त्या पीडितेच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्यात अपयशी ठरली. पण त्यानंतरही हा निकाल बऱ्याच अंगाने महत्त्वाचा ठरला. कारण, या निर्णयानंतर निर्माण झालेला जनआक्रोश व देशभरातील महिला संघटना, विद्यार्थी व कायदेविषयी कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनांनी आधुनिक भारतातील महिला हक्क चळवळीला नवा वेग दिला, असे सरन्यायाधीश म्हणाले.

# मुंबई क्रिकेट असोसिएशन उपाध्यक्षपदी जितेंद्र आव्हाड



■ **मुंबई :** मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीत विविध पदांवर नवीन चेहऱ्यांची निवड झाली आहे. उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते व आमदार जितेंद्र आव्हाड यांनी नवीन शेट्टी यांचा ४८ मतांनी पराभव करून विजय मिळवला.

सचिव पदासाठी उन्मेष खानविलकर यांनी शाह आलम शेख यांचा पराभव करत बाजी मारली. संयुक्त सचिव म्हणून निलेश भोसले यांची निवड झाली, त्यांनी गौरव पय्याडे यांना पराभूत केले. दरम्यान, एमसीएच्या अध्यक्षपदी अजिंक्य नाईक यांची याआधीच बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या संपूर्ण निवडणुकीसाठी एकूण ३६२ जणांनी मतदानाचा हक्क बजावला होता.

संयुक्त सचिवपदासाठी निलेश भोसले (२२८ मते) यांनी गौरव पय्याडे (१२८ मते) यांचा पराभव केला, तर खजिनदारपदावर अरमान मलिक (२३७ मते) यांनी सुरेंद्र शेवाळे (११९ मते) यांच्यावर विजय मिळवला.

# मॉर्निंग वॉकदरम्यान दिसला कापलेला मानवी पाय



**पुणे :** पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात एक अंगावर शहारे आणणारी घटना समोर आली आहे. कळंब गावाच्या हद्दीत कळंबझनीमसाखर रोडवर एका हॉटेलपासून अवघ्या काहीशे मीटर अंतरावर एका पुरुषाचा कापलेला डावा पाय रस्त्याच्या कडेला आढळून आला. बुधवारी सकाळी फिरायला गेलेल्या नागरिकांच्या नजरेस हा अर्धा कापलेला पाय पडताच परिसरात एकच गोंधळ उडाला. काही वेळातच ही माहिती पोलिसांना देण्यात आली आणि वालचंदनगर पोलिस ठाण्याचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. सध्या पोलिसांनी ठिकाणाला सुरक्षा घेराबंदी घातली असून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

हा पाय एका पुरुषाचा असून तो डावा पाय असल्याचे स्पष्ट झाले आहे. पायात मोजा देखील असल्याने हा प्रसंग अचानक घडल्याचे आणि मृतदेहाचा उर्वरित भाग कुठेतरी दुसरीकडे असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

# महायुतीला टक्कर देण्यासाठी 'नवे समीकरण'

## मविआ, बविआ, मनसे एकत्र येण्याची शक्यता : हितेंद्र ठाकूर यांचे संकेत

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होताच नव्या राजकीय समीकरणांच्या चर्चा रंगू लागल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर पालघर जिल्ह्यातील राजकारणात महत्त्वाचे बदल घडू शकतात, असे संकेत बहुजन विकास आघाडीचे नेते हितेंद्र ठाकूर यांनी दिले आहेत. पालघर नगरपरिषद, जिल्हा परिषद आणि महत्त्वाच्या वसई-विरार महानगरपालिका निवडणुकीत महाविकास आघाडी (मविआ), बहुजन विकास आघाडी (बविआ) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) एकत्र येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पालघर जिल्हा आणि वसई-विरार महानगरपालिकेत महाविकास आघाडी-बहुजन विकास आघाडी-मनसे युतीच्या शक्यतेवर चर्चा सुरू असल्याचे स्थानिक नेत्यांनी सांगितले. या संभाव्य युतीबद्दल बहुजन विकास आघाडीचे प्रमुख हितेंद्र ठाकूर यांनी सकारात्मक संकेत दिले आहेत.



त्यांनी महाविकास आघाडीसोबत चर्चा झाल्याची माहिती दिली आहे. पालघर जिल्ह्यातील नगरपरिषदा, जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीसोबत येण्याचा प्रस्ताव बहुजन विकास आघाडीला देण्यात आला असून, त्यावर सकारात्मक चर्चा झाल्याने हितेंद्र ठाकुर यांनी स्पष्ट केले.

पालघर जिल्ह्यातील नगर परिषद, जिल्हा परिषदेत बहुजन विकास आघाडी छोट्या भावाच्या भूमिका निभावेल; मात्र, वसई-विरार महापालिका निवडणुकीत बहुजन विकास आघाडी ही मोठा भाऊ असेल. वसई-विरार महापालिका निवडणुकीसाठी मविआ आणि मनसेशी आघाडी करण्याबाबत चर्चा सुरू असल्याचे हितेंद्र ठाकूर यांनी सांगितले आहे.

हितेंद्र ठाकूर यांनी युतीसाठी सकारात्मकता दर्शवताना सर्व पक्षांना महत्त्वाचा संदेश दिला आहे. सध्या शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि काँग्रेस यांच्यासोबत चर्चा सुरू आहे. ₹नगरपालिकेत निवडून येणारे उमेदवार, कोणतेही रुसवे-फुगवे, हट्ट, मान-सन्मान टाळून युती करावी. जिकडे स्वबळावर लढायचे आहे, तिथे स्वबळावर लढा, अशी सूट देण्यात आलेली आहे.

दोन पावले मागे घेण्याची तयारी सगळ्या पक्षांनी घेतली आहे. सन्मानजनक तोडगा कसा काढता येईल, हे बघावे. मला कुणाचीही ॲलर्जी नाही. कोणत्याही जाती-धर्माला सोबत घेऊन जाणाऱ्या पक्षाशी युती करण्यात माझी कोणतीही हरकत नाही. सर्वसामान्य माणसाला न्याय कसा मिळू शकतो, ते पाहावे, असेच उमेदवार असले पाहिजेत, असे हितेंद्र ठाकूर यांनी स्पष्ट केले.

हितेंद्र ठाकुर यांच्या वक्तव्यावरून वसई-विरार आणि पालघरच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप-शिंदे गटाला टक्कर देण्यासाठी मविआ, बविआ आणि मनसे एकत्र येऊन निवडणुकीचे चित्र बदलू शकतात, असा राजकीय कयास बांधला जात आहे.

# हा निव्वळ खोटारडेपणा..

## मंत्री बावनकुळे यांची स्पष्टोक्ती



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १३ :** भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ठाकरे गटाच्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्र्यांना सरकारबाहेर पडण्याचा इशारा दिल्याच्या दाव्यात कोणतेही तथ्य नसल्याचे ठणकावून सांगितले आहे. हा निव्वळ खोटारडेपणा आहे. मी स्वतः त्यावेळी वर्षा बंगल्यावर होतो. अजित पवार व त्यांचे सहकारी एका वेगळ्याच कामासाठी तिथे आले होते. त्यावेळी त्यांच्यात दानवे म्हणतात तशी कोणतीही चर्चा झाली नाही, असे ते म्हणालेत.

ठाकरे गटाचे आमदार अंबादास दानवे यांनी गुरूवारी अजित पवारांनी पार्थ पवार भूखंड घोटाळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सरकारबाहेर पडण्याचा व सरकारला बाहेरून पाठिंबा देण्याचा इशारा दिल्याचा दावा केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे राज्याच्या राजकारणात एकच खळबळ माजली आहे. या पार्श्वभूमीवर बावनकुळे यांनी त्यांचा दावा फेटाळून लावला आहे.

ते म्हणाले, हा निव्वळ खोटारडेपणा आहे. अंबादास दानवे तिथे नव्हते. मी स्वतः वर्षा बंगल्यावर होतो. अशी कोणतीही चर्चा झाली नाही. अजित पवार, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे वेगळाच विषय घेऊन आले होते. त्यात पुरवणी मागण्या व महायुतीचे काही विषय होते. त्यामुळे मला असे वाटते की, अशी कोणतीही चर्चा झाली नाही.

अंबादास दानवे यांनी पार्थ पवारांचा घोटाळा भाजपनेच बाहेर काढल्याचाही आरोप केला आहे. बावनकुळे यांनी त्यावरही भाष्य केले. ते म्हणाले, ना अंबादास दानवे यांना, ना चंद्रशेखर बावनकुळे यांना किंवा किंवा मुख्यमंत्र्यांना हे माहिती होते. खालच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणात खरी बदमाशी केली. एक तहसीलदार, मुद्रांक अधिकारी व देणारे - घेणारे दोन लोक, या लोकांनी केलेली ही चूक आहे. खालचे अधिकारी काय करतात हे सरकारला थोडेच माहिती असते. जेव्हा बातमी येते तेव्हा सरकार त्याची दखल घेते. त्यामुळे रोजच्या व्यवहारात खालचा एखादा तलाठी, एखादा तहसीलदार किंवा एखादा मुद्रांक अधिकारी काय करेल हे सांगता येत नाही. त्यांना आदेश देण्याचा अधिकार आहेत. ते त्यांच्या अधिकारांचा कसा गैरवापर करतात हे सरकारला थोडेच माहिती असते. सरकारला जेव्हा माहिती होते तेव्हा कारवाई होते.

# माजी आमदार गीता जैन यांना अभियंत्याला चापट मारणे भोवले

## गुन्हा दाखल करण्याचे आदेश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंत्याला सार्वजनिक ठिकाणी चापट मारल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याच्या प्रकरणात माजी आमदार गीता जैन यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. या घटनेच्या संदर्भात आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांनी दाखल केलेल्या तक्रारीवर सुनावणी करताना न्यायालयाने पोलिसांना त्यांच्या विरोधात गुन्हा नोंदविण्याचे आदेश दिले आहेत.



काशीमिरा पोलिसांना भारतीय दंड संहितेच्या कलम 323, 352, 353, 504 आणि 506 अंतर्गत गुन्हा दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. न्यायालयाच्या या आदेशामुळे गेल्या वर्षभरापासून चर्चेत असलेले हे प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

ही संपूर्ण घटना जून 2023 मध्ये मिरा रोड परिसरातील पेणकर येथील कक्कड इमारतीलगतच्या झोपडपट्टी भागात घडली होती. त्या वेळी मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून एका घरावरील तोडक कारवाई करण्यात आली होती.

पावसाळ्याच्या तोंडावर या कारवाईमुळे घर उद्ध्वस्त झाले आणि रहिवासी, महिला व लहान मुले रस्त्यावर आली. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर तेव्हा आमदार असलेल्या गीता जैन स्वतः घटनास्थळी पोहोचल्या आणि अधिकाऱ्यांकडून कारवाईबाबत चौकशी सुरू केली. त्यांनी संबंधित अभियंत्यांना विचारले की, शासनाने पावसाळ्यात बांधकामांवरील कारवाई न करण्याचे आदेश दिले असताना ही कारवाई का झाली? असे विचारत त्यांनी अधिकाऱ्यांवर संताप व्यक्त केला.

या चौकशीदरम्यान अभियंता शुभम पाटील यांनी त्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना हसल्याचे सांगितले जाते.

या वर्तनामुळे गीता जैन यांचा संताप वाढला आणि त्यांनी संतापाच्या भरात त्यांना चापट मारली, असा आरोप करण्यात आला. हा संपूर्ण प्रसंग त्या वेळी उपस्थित असलेल्या काही लोकांनी मोबाईल कॅमेऱ्यात टिपला आणि काही वेळातच व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. या घटनेनंतर माजी आमदारांवर टीकेची झोड उठली होती. अनेकांनी निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीने शासकीय कर्मचाऱ्याशी असे वर्तन करणे अयोग्य असल्याचे म्हटले होते.

घटनेनंतर गीता जैन यांनी माध्यमांशी बोलताना आपल्या कृतीबाबत खेद व्यक्त केला होता. त्यांनी सांगितले होते की, त्या ठिकाणी महिलांच्या डोळ्यांतून अश्रू येत होते, आणि त्या वेळी अधिकारी हसत होता. ते पाहून माझा ताबा सुटला. माझ्याकडून चूक झाली, त्यांनी या वक्तव्यात आपली चूक मान्य केली असली तरी, घटनेनंतर राजकीय आणि प्रशासकीय वतुर्ळात चर्चा रंगली होती.

आता न्यायालयाने या प्रकरणात पोलिसांना गुन्हा नोंदविण्याचे स्पष्ट आदेश दिल्याने तपास सुरू होणार आहे.

# चैत्यभूमीवरील कार्यक्रमासाठी उपराष्ट्रपतींना आमंत्रण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :** महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादरची चैत्यभूमी पुन्हा एकदा आंबेडकरी अनुयायांच्या श्रद्धेचा महासागर बनणार आहे. दरवर्षी लाखो अनुयायी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी येथे एकत्र येतात. या वर्षी मात्र कार्यक्रमाला ऐतिहासिक वळण मिळण्याची चिन्हे दिसत आहेत.

या वर्षीच्या अभिवादन कार्यक्रमासाठी देशातील सर्वोच्च नेतृत्वातील एक मान्यवर व्यक्ती उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर चैत्यभूमी परिसरात उत्सुकता आणि तयारीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांना औपचारिक निमंत्रण पत्र पाठविले आहे. पत्रात त्यांनी म्हटले आहे की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार आणि सामाजिक न्यायाचे अध्वर्यू आहेत. समानता आणि सक्षमीकरणाच्या दिशेने राष्ट्राच्या वाटचालीला त्यांनी दिशा दिली.

बनसोडे यांनी पुढे नमूद केले आहे की, महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमीवरील आपली उपस्थिती ही डॉ. आंबेडकरांच्या कार्याला सन्मान देणारी आणि त्यांच्या विचारांच्या अनुयायांना प्रेरणादायी ठरेल. तसेच, उपराष्ट्रपतींच्या अनुकरणीय सार्वजनिक सेवाभावाचे आणि लोकशाही मूल्यांप्रती असलेल्या वचनबद्धतेचे कौतुकही त्यांनी पत्रात केले आहे.

या आमंत्रणानंतर, ६ डिसेंबर रोजी चैत्यभूमीवर उपराष्ट्रपतींच्या भेटीची शक्यता अधिक बळकट झाली असून, अनुयायांमध्ये आता दिल्लीहून कोण येणार? याबद्दलची चर्चा मुंबईसह संपूर्ण राज्यात रंगताना दिसत आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसकडून ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १३ :** आगामी नगर परिषद आणि नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे.

ही यादी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी प्रसिद्ध केली. या यादीत प्रवक्तेपदी नाकारले गेलेले आमदार अमोल मिटकरी, माजी मंत्री धनंजय मुंडे आणि उमेदवारी न मिळाल्याने काही काळ राजकारणापासून दूर राहिलेले नवाब मलिक यांचा समावेश करण्यात आला आहे.



दरम्यान मराठवाड्यातील आमदार प्रताप पाटील चिखलीकर, सामाजिक सेलचे प्रा.सुनिल मगरे यांच्यासह अभिनेते सयाजी शिंदे यांनाही या यादीत स्थान देण्यात आले असून, राष्ट्रवादी काँग्रेसने या स्टार प्रचारकांच्या माध्यमातून आगामी निवडणुकांमध्ये जोरदार मोहीम राबवण्याची तयारी दर्शवली आहे.

संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणानंतर धनंजय मुंडे यांच्यावर दबाव वाढला आणि त्यामुळे त्यांना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. पण अजित पवार यांनी त्यांना स्टार प्रचारक पद देऊन त्यांच्या राजकीय पुनर्वसनाची सुरुवात केल्याचे दिसते.

या स्टार प्रचारकांमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार प्रफुल्ल पटेल, सुनिल तटकरे, मंत्री हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, अन्न व औषध मंत्री नरहरी झिरवाळ, माणिकराव कोकाटे, बाबासाहेब पाटील, मकरंद पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, अदिती तटकरे, इंद्रनील नाईक, धर्मरावबाबा आत्राम, अनिल भाईदास पाटील, संजय बनसोडे, आ. प्रताप चिखलीकर, नवाब मलिक, नेते सयाजी शिंदे, मुश्ताक अंतुले, समीर भुजबळ, आ. अमोल मिटकरी, आ. सना मलिक, महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर, आ. इद्रीस नायकवडी, माजी आ.अनिकेत तटकरे, माजी आमदार झिशान सिद्दीकी, माजी आमदार राजेंद्र जैन, मुंबई कार्याध्यक्ष सिध्दार्थ कांबळे, प्रदेश सरचिटणीस सुरज चव्हाण, लहू कानडे, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, सुनिल मगरे, अल्पसंख्याक सेलचे प्रदेशाध्यक्ष नाझेर काझी, महेश शिंदे, श्रीमती राजलक्ष्मी भोसले, सुरेखाताई ठाकरे, नजीब मुल्ला, श्रीमती प्रतिभा शिंदे, विकास पासलकर आदींचा समावेश आहे.

# शिंदे सेनेने कंबर कसली

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :** शिवसेना मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणूक- 2025 पार्श्वभूमीवर शिवसेनेने (शिंदे गट) जोरदार तयारी सुरू केली आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षाने महत्त्वाच्या 'निवडणूक प्रभारी पदांच्या नियुक्त्या' जाहीर केल्या आहेत.

शिवसेनेचे सचिव भाऊसाहेब चौधरी यांनी ही यादी प्रसिद्ध केली आहे.यामध्ये केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, मंत्री उदय सामंत, गुलाबराव पाटील, अब्दुल सत्तारांसह संपूर्ण राज्यातील नेतृत्वाला प्रचारात उतरवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सुमारे ७० हून अधिक नेत्यांवर ही मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. यामुळे शिवसेनेने आगामी निवडणुकीसाठी कंबर कसल्याचे दिसून येत आहे. शिवसेनेने जाहीर केलेल्या या प्रभारींच्या यादीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अत्यंत चुरशीच्या होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. निवडणूक प्रभारी म्हणून उदय सामंत, सदानंद चव्हाण, योगेश कदम, राजन साळवी, आमदार किरण सामंत यांच्यासह अनेकांवर जबाबदारी देण्यात आली आहे.

# स्व. वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व सहकार महर्षी स्व.वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त विधान भवन परिसरातील त्यांच्या पुतळ्यास विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुष्पहार व पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी विधानमंडळ सचिवालयाचे सचिव-१ जितेंद्र भोळे, उप सभापती यांचे खाजगी सचिव अविनाश रणखांब, अवर सचिव (समिती) सुरेश मोगल, संचालक, वि.स.पागे, संसदीय प्रशिक्षण केंद्र आणि जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही स्व.वसंतदादा पाटील यांच्या पुतळ्यास अर्पण करुन अभिवादन केले.

# आरोग्य योजनांमुळे वारकऱ्यांना तत्काळ आणि विनामूल्य उपचार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :** जुन्या पुणे - मुंबई महामार्गावर पहाटे वारकऱ्यांच्या दिंडीत झालेल्या दुर्दैवी अपघातानंतर प्रशासन आणि आरोग्य विभागाने दाखविलेली तत्परता आणि संवेदनशीलता कौतुकास्पद ठरली आहे.

अपघातात जखमी झालेल्या सर्व वारकऱ्यांना महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून पूर्णपणे विनामूल्य आणि गुणवत्तापूर्ण उपचार उपलब्ध करून देण्यात आले.

अपघातानंतर काही मिनिटांतच महावीर हॉस्पिटल, कामशेत येथे जखमींना दाखल करण्यात आले. शासनाच्या आपत्कालीन उपचार आदेश प्रक्रियेच्या माध्यमातून तत्काळ शस्त्रक्रिया, औषधोपचार आणि आवश्यक वैद्यकीय सेवा सुरू करण्यात आल्या. यामुळे कोणत्याही रुग्णाला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला नाही.

राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या आरोग्य योजनांचा लाभ मिळाल्याने रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांना मोठा दिलासा मिळाला आहे. उपचार, औषधे आणि रुग्णालयीन सेवा या सर्व सुविधा शासनाच्या सहाय्याने पूर्णपणे विनामूल्य पुरविण्यात येत आहेत.

या प्रसंगी आरोग्य विभागाने दाखवलेली संवेदनशीलता आरोग्य हक्क – सर्वांसाठी या शासनाच्या ध्येयाला प्रत्यक्ष कृतीत उतरवणारी ठरली आहे. शासनाच्या आरोग्य योजनांमुळे ग्रामीण आणि वारकरी समाजालाही अत्याधुनिक उपचार सेवा सहज उपलब्ध होत असल्याचे या घटनेतून अधोरेखित झाले.

महावीर हॉस्पिटल प्रशासन, स्थानिक पोलीस आणि आरोग्य विभागाने समन्वयातून काम करत सर्व जखमींना तातडीने सेवा उपलब्ध करून दिली. शासनाकडून आवश्यक सुविधा, औषधांचा पुरवठा आणि सर्वतोपरी मदत पुरविण्यात आली आहे.





या घटनेतून शासनाच्या आरोग्य यंत्रणेची कार्यक्षमता आणि सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्य सुरक्षिततेबद्दलची बांधिलकी पुन्हा एकदा दृढ झाली आहे.

# सहा महिन्यांपासून रखडले गोशाळांचे अनुदान

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१३ :** राज्यातील नोंदणीकृत गोशाळांना देशी गायींच्या (गोमाता) संगोपनासाठी देण्यात येणारे अनुदान गेल्या सहा महिन्यांपासून रखडल्यामुळे गोशाळा चालकांसमोर मोठा आर्थिक पेच निर्माण झाला आहे.

एकीकडे वाढत्या महागाईमुळे गायींचे पालनपोषण करणे कठीण झाले आहे, तर दुसरीकडे शासनाकडून मिळणारे तुटपुंजे अनुदानही वेळेवर मिळत नसल्याने ह्यगोमातेह्नचा सांभाळ करताना गोशाळांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

राज्यातील देशी गायींना गोमाता दर्जा दिल्यानंतर त्यांच्या संगोपन, संवर्धन आणि पालनपोषणासाठी राज्य शासनाकडून आर्थिक साहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार नोंदणीकृत गोशाळांना प्रतिगाय दररोज ५० रुपये इतके परिपोषण अनुदान दिले जाते.

राज्यात एकूण १०६८ गोशाळा आहेत.



या गोशाळांकडे नोंदणी केलेल्या गोशाळांना अनुदान दिले जाते. राज्यात ५३ हजार देशी गायी आहेत. गोवंश हत्याबंदीमुळे भाकड व अनुत्पादक गायींना गोशाळांमध्ये दाखल केले जाते. तसेच मोकाट जनावरे आणि पोलिस कारवाईनंतर सुटका केलेल्या जनावरांचेही संगोपन गोशाळा करतात.

मात्र, शासनाकडून केवळ नोंदणीकृत गोशाळांतील देशी गायींसाठीच अनुदान दिले जाते, इतर पशुधनासाठी कोणताही आधार मिळत नाही. शासनाने राज्यातील गोशाळा, गोसदन, पांजरपोळ आणि गोरक्षण संस्थांना बळकट करण्यासाठी आर्थिक साहाय्य देण्याचा निर्णय घेतला असला तरी हेच आर्थिक साहाय्य वेळेवर मिळत नसल्याने गोशाळा चालकांमध्ये तीव्र नाराजी आहे. थकीत अनुदानाकडे गोशाळा संचालकांचे लक्ष आहे.

**सरकारचे अनुदान वेळेत नाही**

गोशाळांना जानेवारी ते मार्च २०२५ या तीन महिन्यांचे अनुदान मिळाले. मागील सहा महिन्यांपासून अनुदान रखडल्याने गोशाळांना गोमातेचा सांभाळ करताना खूपच कसरत करावी लागत आहे.

पूर्वी समाजातील देणगीदारांकडून गोशाळांना मदत मिळत होती. मात्र शासनाकडून अनुदान मिळण्याची घोषणा झाल्यानंतर देणगीदारांचाही हात आखडता घेतला आहे.

सरकारचे अनुदान वेळेत नाही आणि देणगीदारांकडूनही मदत नाही अशी गोशाळाचालकांची कोंडी झाली आहे. देशी गायींना राज्य मातेचा दर्जा दिला, पण चाऱ्यासाठी पैसे मिळत नाही

**दत्ता रघुनाथ पाहारे**
अध्यक्ष,माता इंद्रायणी गोशाळा, मानधनी, जि. परभणी

------------

१ ते ४ नोव्हेंबरपर्यंत पात्र ४६५ गोशाळांना एक महिन्याचे अनुदान देण्यात आले आहे. पाच महिन्यांचे अनुदान शिल्लक आहे. ५० गोवंश असलेल्यांना १५ लाख, १०० हून अधिक असलेल्यांना २० लाख आणि २०० हून अधिक असलेल्यांना २५ लाख रुपये अनुदान वाटप केले .

**शेखर मुंदडा**
अध्यक्ष, गोसेवा आयोग

# बालक म्हणजेच भविष्यातील समाजाचे शिल्पकार



१४ नोव्हेंबर हा दिवस भारतात ह्वबालदिनह्व म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व असे की हा भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जयंती दिवस आहे.पंडित जवाहरलाल नेहरूंना बालकांविषयी अपार प्रेम होते. त्यांच्या हृदयात मुलांप्रती जिव्हाळा, स्नेह आणि करुणा होती. ते म्हणत, आजची मुले उद्याचा भारत घडवतील. त्यांच्यावर देशाचे भविष्य अवलंबून आहे. खरंच, एक समाज, एक राष्ट्र अथवा एक संस्कृती किती प्रगत, संवेदनशील आणि सुजाण होईल याचा पाया त्याच्या बालकांच्या संगोपनात दडलेला असतो.

------------

बालक म्हणजेच भविष्यातील समाजाचे शिल्पकार हा विचार केवळ एक घोष नव्हे तर एका संपन्न, न्याय्य, प्रगतिशील आणि मानवतावादी समाजव्यवस्थेची मुळाक्षरे आहे. मानवसमाजाचे अस्तित्व चालू ठेवणारा, त्यात बदल, विकास आणि सुधारणांची बीजांकुरे पेरणारा घटक म्हणजे बालक होय. त्यामुळे बालकांचे संगोपन, संरक्षण, शिक्षण आणि व्यक्तित्वविकास ही समाजाची केवळ नैतिक जबाबदारी नाही तर अस्तित्वाची गरज आहे.

बालक हा जन्मतः निष्पाप, कोवळा, कोरा आणि जगाविषयी उत्सुकतेने भरलेला असतो. हा कोरा कागद समाज, कुटुंब, शाळा, सांस्कृतिक संस्था, माध्यमे आणि आजूबाजूच्या परिस्थितीच्या स्पर्शाने आकार घेतो. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता बालक समाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून माणूस म्हणून घडतो. या समाजिकीकरणाच्या प्रवासात बालकाला जे मूल्य, नैतिकता, संस्कार, दृष्टीकोन आणि जीवनपद्धती देण्यात येते तीच पुढील पिढीचा कणा बनते. त्यामुळे बालकांचे संगोपन हा वैयक्तिक नाही तर सामाजिक गुंतवणुकीचा भाग आहे.

ज्या समाजात बालकांना सुरक्षित वातावरण, प्रेम, शिक्षण आणि संधी उपलब्ध होते तो समाज पुढे जाऊन विकासशील आणि समतामूलक होतो. उलट, ज्या समाजात बालकांना दुर्लक्षित, शोषित आणि उपेक्षित ठेवलं जातं तिथे असमानता, हिंसा, अन्याय आणि अत्याचार वाढतो.

भारतीय समाजरचनेत बालकांची स्थिती पाहिली तर एक चित्र आशादायी तर दुसऱ्या बाजूला चिंताजनक आहे. एकीकडे मुलांचे हक्क, शिक्षण आणि संरक्षण यासाठी कायदे, धोरणे आणि शासकीय योजना अस्तित्वात आहेत.

'मुलांकरिता मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकार अधिनियम २००९', बालकांचे संरक्षण कायदा, बालकल्याण समित्या, अंगणवाडी योजनेपासून बाल आरोग्य राष्ट्रीय कार्यक्रमांपर्यंत अनेक उपक्रम राबवले जात आहेत. परंतु वास्तवात अजूनही शिक्षणाऐवजी मजुरी करणारी मुले, रस्त्यावर भटकणारी निराधार मुले, कुपोषणाची झळ सोसणारी बालके, तस्करी आणि अत्याचारांची बळी पडणारी मुले, सामाजिक-आर्थिक विषमतेमुळे शाळेबाहेर पडणारी मुले हा कटू अनुभव आपल्या समाजात दिसतो.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5
@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

समाज कितीही प्रगत झाल्याचे उदाहरण दिले तरी बालकांच्या चेहऱ्या वरची असुरक्षितता, भीती, उपासमार किंवा असमान संधींची वेदना समाजाच्या अंतरात्म्याला खणखणीत प्रश्न विचारते.

बालकांना सुरक्षित आणि पोषक वातावरण देण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे ह्यकुटुंबह्न होय. कुटुंब ही बालकाची पहिली शाळा आणि आई-वडील हे पहिले शिक्षक आहेत. पण पाहिलं तर आधुनिक काळात कुटुंबसंस्था मोठ्या प्रमाणात बदलत चालली आहे. आर्थिक ताण, स्थलांतर, संधींची स्पर्धा, माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव, कुटुंबातील संवादाचा अभाव, पालकांचे व्यसनाधीन आणि मानसिक तणावग्रस्त होणे यामुळे बालकांवर गंभीर परिणाम दिसतो.

मुलांच्या भावनिक गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत तेव्हा बालक अंतर्मुख, अस्वस्थ, आक्रामक किंवा तुटक बनतो. समाजात आज वाढणारी हिंसक वर्तणूक, नैराश्य, आत्महत्या, अभ्यासाविषयीचा ताण, वर्तनातील बदल हे फक्त वैयक्तिक नव्हे तर सामाजिक संकेत आहेत. बालकांच्या मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे भविष्यावर आणि देशाच्या भविष्यावर आघात आहे.

शाळा हा बालकांच्या विकासाचा दुसरा महत्त्वाचा स्तंभ होय. शाळा केवळ ज्ञान देण्याचे केंद्र नसून व्यक्तिमत्वविकास, मूल्यसंस्कार, सामाजिक जाण, नेतृत्वगुण, सहकार्य, सहिष्णुता आणि मानवी संवेदना विकसित करण्याचे स्थान आहे. शिक्षण हा केवळ गुण, परीक्षांचे निकाल, शिष्यवृत्ती किंवा प्रमाणपत्र यापुरता विषय नाही.

शिक्षण म्हणजे जागृती, विवेक, विचारशक्ती, प्रश्न विचारण्याची क्षमता, निर्णयक्षमता आणि स्वतःचा स्वभाव ओळखण्याची प्रक्रिया. आज शिक्षण व्यवस्थेत अनेक सुधारणा होत आहेत, पण शिक्षणात मानवता आणि सहजतेला टिकवून ठेवणे ही खरी कसोटी आहे. शिक्षक हा केवळ अध्यापन करणारा व्यक्ती नसून बालकाच्या मनाचा शिल्पकार आहे. शिक्षकाच्या एका शब्दाने, एका स्पर्शाने, एका प्रोत्साहनाने बालकाचे आयुष्य आकार घेऊ शकते. म्हणून शिक्षक-विद्यार्थी नात्यातील मानवी स्पर्श टिकुन राहणे अत्यावश्यक आहे.

आजचे युग विज्ञान आणि माहिती-तंत्रज्ञानाचे आहे. मोबाइल, इंटरनेट आणि सामाजिक माध्यमे आज बालकांच्या हातात सहज उपलब्ध आहेत. यामुळे ज्ञानाचा अवकाश नक्कीच वाढला आहे. परंतु त्याचबरोबर भौतिकवादी, कृत्रिम, आभासी आणि बनावट मूल्यांचे जग देखील बालकाला ओढू लागले आहे. त्यामुळे बालकांना तंत्रज्ञानाचा सुजाण आणि संतुलित वापर शिकवणे ही वेळेची गरज आहे.

नैतिकता, मूल्यसंस्कार, सहानुभूती, विनम्रपणा, संवादकौशल्य, निसर्गावरील प्रेम आणि मानवी जीवनाच्या मूळ भावनांची जपणूक करणे हे डिजिटल युगात महत्वाचे ठरते.

बालक म्हणजेच भविष्यातील समाजाचे शिल्पकार हा विचार तेव्हाच साकार होतो, जेव्हा बालकांना केवळ जिवंत राहण्याचा हक्क नव्हे, तर वाढण्याचा, स्वप्न पाहण्याचा, व्यक्त होण्याचा आणि माणूस म्हणून आदर मिळण्याचा हक्क दिला जातो.

प्रत्येक बालक हे मूलतः संभाव्य प्रतिभेचे केंद्र असते. ते कशात उत्तम आहेत, त्यांच्या मनाची दिशा काय आहे, त्यांची स्वप्ने कोणती आहेत हे ओळखणे ही मोठ्यांची जबाबदारी आहे. सर्व मुले एकसारखी नसतात, त्यांची वाढ, क्षमता, आवडीनिवडी, भावनिक गरजा वेगळ्या असतात. त्यामुळे त्यांना समान संधी देणे म्हणजे प्रत्येकाला त्याच्या वैशिष्ट्याप्रमाणे विकसित होऊ देणे होय.

यासाठी कुटुंब, शाळा, समाज, शासन, स्वयंसेवी संस्था, माध्यमे या सर्वांनी एका दिशेने प्रयत्न करणे गरजेचे आहे. बालकांच्या विकासात गुंतवणूक करणे म्हणजे पायाभूत सुविधांमध्ये नव्हे तर मानवी विकासात गुंतवणूक करणे होय. ही गुंतवणूक कधीच वाया जात नाही, उलट ती एक संस्कृती, एक राष्ट्र, एक परिपूर्ण समाज घडवते.

१४ नोव्हेंबरचा बालदिन हा केवळ आनंद, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम किंवा गोड खाऊचा दिवस नाही. हा दिवस बालकांच्या प्रश्नांना, त्यांच्या हक्कांना, त्यांच्या भविष्याला, त्यांच्या संरक्षणाला आणि त्यांच्या स्वप्नांना गांभीर्याने पाहण्याची स्मृती आहे.

आज आपण जर प्रत्येक बालकाला सुरक्षित, सन्मानित, शिक्षित, प्रेमाने भरलेले आणि संधींनी समृद्ध वातावरण दिले तर उद्याचा समाज अधिक सक्षम, न्याय्य, समतामूलक, संवेदनशील आणि मानवतावादी असेल. कारण की ह्वआजचे बालक म्हणजे उद्याचा नागरिक, उद्याचा समाज, उद्याचे राष्ट्र आहे.ह्व म्हणूनच प्रत्येकाला हे जाणण्याची गरज आहे की आजचे बालक म्हणजेच भविष्यातील समाजाचे शिल्पकार आहेत.

■ ■ ■

# खोटेपणाला मर्यादा हवी!

वर्तमानात खोटे पणाला फारच महत्त्व आलेले दिसून येते. खोट्यालाही वेगळी चव असते. स्वतः बोलले तर गोड वाटते आणि दुसऱ्यांनी बोलले तर कडू लागते. खोट बोला पण रेटून बोला असे आजचे युग आहे. लोक काय म्हणतील याचा सुध्दा विचार करीत नाही. पण, मनात खोट बोलण येतच कसं? नकारात्मक बाबी मनातून काढून टाकल्या तर जिवनात प्रत्येक गोष्ट शक्य आहे. खोट बोलल्याने आपण पुढच्या पिढीला, व्यक्तीला किंवा परिस्थितीला फसवतो आहोत.

सुख व दुःख आपल्या कर्मानुसार मिळते, गरीबी, श्रीमंतीचा काही संबंध नसतो. रडणारा महालात ही रडतो आणि हसणारा झोपडीत ही हसतो. खोटे बोलणे सोपे वाटू शकते परंतु दिर्घ काळात ते अधिकच क्लिष्ट असू शकते. म्हणुनच सत्यावर नेहमी प्रेम करा.

खोटेपणामुळे नातं नष्ट होवू देवू नका. खोटेपणा माणसाला फक्त तात्पुरते सुख देते पण, विश्वास कायम टिकून राहत नाही. मुळात हे सर्व सांगण्याचे प्रयोजन म्हणजे सद्य परिस्थितीत ईपीएस ९५ पेन्शन धारकांचे हलाखीचे जीवन. गेल्या १० ते १५ वर्षापासुन पेंशन वाढीकरिता लढा सुरू आहे. २०१४ ला कोशीयारी समितीने रिपोर्ट या समवेत सर्वोच्च न्यायालयाचा ४/११/२०२२ चा निकाल तसेच १० ते १५ पेन्शन वाढीबाबत विविध समितीचे रिपोर्ट हे सर्व पेंशन धारकांच्या बाजूने असून सुध्दा वर्तमान सरकार या गोष्टीकडे लक्ष देत नाही.

सरकार नेहमी खोटे आश्वासन देवून जेष्ठ पेंशन धारकांची फसवणुक करीत आहे. वर्तमानात सरकारने स्वतःकडून समितीला सकारात्मक पत्र देवून सुध्दा पेंशन मध्ये वाढ न करणे याचा अर्थ काय? सर्व ईपीएस पेंशन धारक दुःखी आहेत. आता वर्तमान सरकारवर, नेत्यावर विश्वास राहिलेला नाही.





या बाबतीत ईपीएफओ अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता असे निदर्शनास आले आहे की, सर्व डाटा तयार आहे पण, सरकार कडून आलेच नाहीत. सर्व डाटा तयार असतांना सरकारची पेंशनवाढ देण्याची मानसिकता का नाही? दुसरीकडे समाज माध्यमांवर सपशेल खोट्या बातम्या दिल्या जात आहेत.

खोटेपणा फार जास्त दिवस टिकत नसतो. एक दिवस त्याचे भांडे फुटणारच. कोणत्याही गोष्टीला मर्यादा हवी. सर्वोच्च न्यायालयाचा अवमान आणि जेष्ठ पेंशन धारकांचा अपमान याचे परिणाम भविष्यात होतीलच कारण खोटेपणा जास्त दिवस टिकत नाही.

पेंशन वाढीसाठी देशात ज्या ज्या समित्या प्रयत्नशील आहेत त्यांना अखेरपर्यंत यश हे मिळेलच. तेव्हा वर्तमानात सकारात्मकतेने विचार करण्याची गरज आहे. सत्याच्या मार्गावर, लोकांच्या कामावर (पेंशन वाढीचा) भर झाला तर योग्य दिशेने तुमची आमची प्रगती होईल. अन्यथा वर्तमानातील नेत्यांचे चांगले दिवस भविष्यात घसरणीवर आल्याशिवाय राहणार नाही.

**जाता जाता...**

सत्याच्या मार्गाने चांगले गुण आत्मसात करा तेच खऱ्या अर्थाने जिवन प्रवासात योध्दा बनुन आपल्या मागे उभे राहतात. खोटे बोलणे म्हणजेच जाणीव पुर्वक केलेली फसवणूकच होय. ती कोणत्याही स्वरूपाची का असेना? ई पी एस ९५ पेंशन लवकरच वाढ होत आहे अशा आशयाचे भावनिक पोस्ट यु ट्यूब चॅनल / माध्यमांकडून दिल्या जात असतात. त्या बंद करण्याचे अगत्याचे आहे. अशा खोट्या पोस्टमुळे सरकारची प्रतिमा जगभरात मलीन होत असते याचा विचार केला जावा.

पेंशन धारकांचा योग्य सन्मान करून येत्या दिवसात आयुष्याच्या संध्याकाळी पेंशन वाढीबाबत वेळीच दिलासा देवून खोटे आश्वासने देणे भविष्यात टाळावे. आपण सत्याच्या मागे असल्याने दडलेल्या आनंद गुणाचा शोध घेणे सहज सोपे जाते.

खोट्याच्या मागे असल्याने स्वतः (मग कोणतेही क्षेत्र का असेना) चे मुल्यांकन कमी होत असते. सत्याच्या शेजारी उभ राहुन नक्कीच मोठ होता येते.

ई पी एस ९५ पेन्शन धारकांचे वाढीव पेन्शन वर्तमान महागाईचा विचार सरकारला करावेच लागेल. सरकारने सकारात्मक विचार करून जेष्ठ पेंशन धारकांना लवकरच योग्य दिलासा मिळेल याकरीता दूरदृष्टी आणि भावनांचा विचार करणे अत्यावश्यक आहे.

■ ■ ■



विजय सिताराम सोनारघरे
स्नेहविजय, 24,
उदयनगर, नागपूर.
9325733836

# क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे

आज १४ नोव्हेंबर, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांची जयंती. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.



वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे.

वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे (राऊत) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रागाराचे प्रमुख होते.

लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले.

पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली.

भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले.

लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यातील रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली.

याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले.

मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनव्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली.

या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले.

१७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याचा ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन! ■ ■ ■

# लग्न जुळवण्यासाठी सूचक संस्था, परिचय संमेलने प्रभावी पर्याय

आजच्या धकाधकीच्या आणि स्पर्धात्मक युगात मुला-मुलींचे लग्न जुळवणे हे पालकांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. पूर्वी जसे नातलग, आप्तेष्ट आणि गावातील समाजसंपर्कांद्वारे विवाह जुळवले जात, तसे आता होत नाही. विभक्त कुटुंबांची वाढती संख्या, बदलत्या जीवनशैलीमुळे आणि वधु-वरांच्या वाढत्या अपेक्षांमुळे पारंपरिक जुळवणी प्रणाली आता अपुरी ठरू लागली आहे. अशा परिस्थितीत वधु-वर सूचक संस्था आणि परिचय संमेलने हे उत्तम आणि विश्वासार्ह पर्याय म्हणून उदयास आले आहेत.

नागपूर येथील नालंदा मंगलमैत्री संस्थाचे संचालक प्रशांत सहारे म्हणाले की, आम्ही शहरी व ग्रामीण भागातील अंतर मिटविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहोत. आज बहुतेक विवाह इच्छुक आपल्या जिल्ह्यातील स्थळांना प्राधान्य देतात, म्हणून आम्ही जिल्हानिहाय ग्रुप्स तयार केले आहेत. प्रत्येक परिचयपत्रातील माहिती खरी आणि अचूक असावी याकडे आमचा विशेष भर असतो. आम्ही प्राप्त झालेली माहिती जशीच्या तशी इच्छुकांना पोहोचवतो, ज्यामुळे दोन्ही पक्ष थेट संवाद साधू शकतात आणि लग्नाची जुळवणी सुलभतेने होते. त्यांनी पुढे सांगितले की, काही संस्था किंवा वेबसाईट्स संपर्क क्रमांक दडवून ठेवून आर्थिक लाभ घेण्याचा प्रयत्न करतात, ज्यामुळे समाजाची फसवणूक होते. अशा प्रथांचा त्यांनी तीव्र शब्दांत निषेध केला.



प्रमोद जांभूळकर
नागपूर.

अनेक पालक आणि वधु-वर पुनःपुन्हा बायोडाटा शेअर करूनही अपेक्षेप्रमाणे जोडीदार शोधण्यात अपयशी ठरतात. त्याचप्रमाणे बोगस वेबसाईट्समुळे अनेकांची फसवणूक झाल्याचेही उदाहरणे दिसतात. या पार्श्वभूमीवर धम्ममेत्ता बुद्धिस्ट मॅट्रोमोनी सारखी मोफत सेवा देणारी आणि विश्वसनीय वेबसाईट विवाह इच्छुकांसाठी एक मोठा दिलासा ठरत आहे. वधु-वरांना एकमेकांचा प्रत्यक्ष परिचय करून देण्यासाठी समाजातील विविध संघटना वधु-वर परिचय संमेलने आयोजित करीत असतात. या माध्यमातून वेळ आणि पैसा दोन्हीची बचत होत असून अनेक शुभविवाह या मार्गाने यशस्वीरीत्या जुळत आहेत.

आजच्या काळात लग्न जुळवणीसाठी सूचक संस्था आणि परिचय संमेलने हे सर्वात योग्य, पारदर्शक आणि परिणामकारक पर्याय ठरले आहेत. इच्छुकांना या संधींचा लाभ घेता येवू शकेल.

■ ■ ■

# सर्व शाळा-महाविद्यालयात 'वंदे मातरम' म्हटले जावे

**वाचक लिहितात**

वन्दे मातरम् या राष्ट्रीय गीताच्या वादाच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेश राज्याचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालये यांमध्ये वन्दे मातरम् म्हणणे बंधनकारक करणार असल्याची घोषणा केली. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले की, जर देशाच्या अखंडतेवर आघात करण्यासाठी कुणी महंमद अली जिनाइशण सारखा उदयास आला, तर त्याला दफन केले जाईल.

देशात पुन्हा फाळणी होण्याची स्थिती निर्माण होऊ देऊ नये. आज भाषा आणि जात यांच्या नावाखाली फाळणी करण्याचा प्रयत्न होत आहे; परंतु कोणताही धर्म किंवा मत राष्ट्रापेक्षा मोठे असू शकत नाही.' संविधानाने समस्त भारतीयांना उपासना आणि धर्मस्वातंत्र्य दिले असले, तरी जिथे राष्ट्राचा विषय येतो तिथे धार्मिक अधिकार वगैरे दुय्यम ठरतात. राष्ट्रहिताच्या निर्णयात धार्मिक बाबींनी नाक खुपसू नये हा सरळ साधारण नियम आहे. असे असताना काही कट्टरपंथीय नेते 'वन्दे मातरम्' ला नाहक विरोध करताना दिसत आहेत.

स्वातंत्र्यलढ्यात 'वन्दे मातरम्' ही क्रांतिकारकांची प्रमुख घोषणा होती. देशप्रेमी नागरिकांचा उर भरून आणणारी ही घोषणा त्याकाळी क्रांतीकारकांना मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी प्राणपणाने लढण्याचे बळ देत होती, त्यांच्यात वीरश्री निर्माण करत होती, त्यांना क्रांतीची प्रेरणा देत होती. शेकडो क्रांतिकारक त्यावेळी 'वंदे मातरम' चा घोष करत हसत हसत बलीवेदीवर चढले, कितीतरी वीरांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या, कारागृहात मरणप्राय यातना सहन केल्या. ज्यामध्ये केवळ हिंदूच नव्हे, तर कितीतरी मुस्लिम क्रांतिकारकांचाही सहभाग होता. वन्दे मातरम् घोषणेला त्याकाळी कुणीही आक्षेप घेतला नसताना आज या गीताला विरोध का? असाही प्रश्न यनिमित्ताने राष्ट्रप्रेमी नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

काही कट्टरतावादी नेत्यांनी भारतीय जनता पक्षाला टार्गेट करून भाजप यामाध्यमातून धार्मिक अजेंडा राबवत असल्याचा आरोप केला आहे. राज्यात समाजवादी पार्टीचे आमदार अबू आझमी यांनी कोणताही मुसलमान 'वंदे मातरम' म्हणू शकत नाही म्हणत वन्दे मातरम् म्हणण्याच्या निर्णयाला विरोध केला.

जम्मू काश्मीरमध्ये मुत्तहिदा मजलिस-ए-उलेमा या कट्टरपंथी संघटनेनेने 'वंदे मातरम' गीत गैर इस्लामी असल्याचे म्हणत या गीताला विरोध केला आहे, देशात अन्यत्रही कट्टरपंथी संघटना मुस्लिमांना 'वंदे मातरम' न म्हणण्याचे आवाहन करत आहेत.

देशासाठी सर्वस्व बहाल करणाऱ्या क्रांतीकारकांना संजीवनी देण्याचे कार्य स्वातंत्र्यपूर्व काळात 'वंदे मातरम' या द्वीअक्षरी मंत्राने केले आहे. हे गीत सर्वप्रथम ७ नोव्हेंबर १८७५ रोजी बंकिमचंद्र यांच्या 'बंगदर्शन' या साहित्यिक मासिकात प्रकाशित झाले. नंतर बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८८२ मध्ये प्रकाशित 'आनंदमठ' या कादंबरीत या गीताचा समावेश केला.

' वन्दे मातरम्' हे गीत पहिल्यांदा १८९६ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कोलकाता अधिवेशनात रवींद्रनाथ टागोर यांनी गायले होते. १९०५ मध्ये झालेल्या बंगालच्या फाळणी विरोधातील 'स्वदेशी' आंदोलनात हे गीत क्रांतीकारक आणि सामान्य जनतेचा युद्धघोष बनले.

देशभरात वन्दे मातरम् च्या जयघोषाने ब्रिटीश सत्तेला हादरे दिले. २४ जानेवारी १९५० रोजी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी संविधान सभेत ' वन्दे मातरम्' या गीताला राष्ट्रीय गीताचा दर्जा दिला. राष्ट्रगीताच्या खालोखाल बहुमान असणाऱ्या या प्रेरणा गीताला १५० वर्ष पूर्ण होत आहेत ही स्वातंत्र्याची फळे चाखणाऱ्या समस्त भारतीयांसाठी खरेतर अभिमानाची बाब आहे असे असताना त्याला धार्मिक रंग देणाऱ्यांच्या बुद्धीची खरेतर कीव करावीशी वाटते.

'जननी जन्म भूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ॥' हे हजारो वर्षांपूर्वी लिहिलेल्या वाल्मिकी रामायणातील वाक्य आहे, याचा अर्थ आई आणि मातृभूमी हे दोन्हीही स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहेत. जन्मदात्या आईनंतर श्रेष्ठ कोणी असेल तर ती मातृभूमी आहे त्यामुळे तिला वंदन करणे हे या मातृभूमीत राहणाऱ्या प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे हें लक्षात घेऊन केवळ एक-दोन राज्यांत नव्हे तर केंद्र सरकारने आपल्या अधिकारांचा वापर करत भारतातील समस्त शाळांमध्ये प्रतिदिन ' वन्दे मातरम्' गीत म्हणणे बंधनकारक करावे! हीच खरी क्रांतिकारकांच्या प्रति श्रद्धांजली असेल !'

■ सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.

# केसांची निरोगी वाढ होण्यासाठी काही महत्वाच्या टिप्स



प्रत्येकाला आपले केस लांब, दाट आणि मजबूत असावेत असे वाटते. पण आजकाल ताणतणाव, खराब आहार, प्रदूषण आणि रासायनिक उत्पादनांमुळे केस गळणे आणि कोरडेपणा ही समस्या सामान्य झाली आहे. यामुळे एकाच ठिकाणी केसांची वाढही थांबते.

तथापि, आपण इच्छित असल्यास, आपण काही नैसर्गिक पद्धतींचा प्रयत्न करून हे नुकसान कमी करू शकता, जे केसांच्या वाढीस देखील प्रोत्साहित करू शकतात. आयुर्वेदिक तज्ज्ञ आर. के. चौधरी यांनी आपल्या इन्स्टाग्राम हँडलवर एक व्हिडिओ शेअर केला आहे आणि अशा पद्धतींबद्दल सांगितले आहे. हे आयुर्वेदिक उपाय आपल्या केसांसाठी खूप फायदेशीर ठरू शकतात.

**दिवसाची सुरुवात सकाळी मेथीच्या पाण्याने करा** : मेथीच्या दाण्यांमध्ये डीएचटी-ब्लॉकिंग गुणधर्म असतात, जे केस गळतीचे मुख्य कारण टाळतात. अशा परिस्थितीत एक चमचा मेथीचे दाणे रात्री पाण्यात भिजवून सकाळी त्याचे पाणी गाळून प्यावे. हे केसांची मुळे मजबूत करते आणि टाळूमध्ये रक्ताभिसरण वाढवते.

**दररोज १० मिनिटे पृथ्वी मुद्रा करा** : आयुर्वेदानुसार, पृथ्वी मुद्रा केल्याने केसांच्या मुळांचे पोषण होते आणि शरीरातील जीवनसत्त्वे आणि खनिजांचे संतुलन राखले जाते. हे करण्यासाठी आपल्या हाताच्या अनामिका बोटाला अंगठ्याने जोडा आणि उर्वरित तीन बोटे सरळ ठेवा. दररोज १० मिनिटे असे करा.

दररोज १ मिनिट उंट पोज करा उन्तासन केल्याने डोक्याच्या दिशेने रक्तप्रवाह वाढतो, ज्यामुळे केसांची मुळे सक्रिय होतात. हे योगासन केवळ केसांच्या वाढीस मदत करत नाही तर पाठीचा कणा आणि पाठ देखील मजबूत करते. अशा परिस्थितीत, दररोज किमान एक मिनिट उन्तासन करा.

**बॅक-कंगवा हलक्या हातांनी मागून पुढे कंगवा करा** : आयुर्वेदतज्ज्ञ आर. के. चौधरी यांच्या मते, असे केल्याने झोपलेल्या केसांची मुळे सक्रिय होतात. तथापि, हे लक्षात ठेवा की केस कोरडे आणि गुंतागुंतीचे नसावेत, अन्यथा ते तुटू शकतात.

हेड ड्रॉप पोज यासाठी डोके काही सेकंद खाली वाकवून ठेवा. यामुळे डोक्याला ऑक्सिजनचा पुरवठा वाढतो आणि केसांच्या मुळांना अधिक पोषण मिळते. आयुर्वेदिक तज्ञांच्या मते, केस वाढवण्याचा हा एक सोपा परंतु प्रभावी मार्ग आहे.

आर. के. चौधरी म्हणतात, जर तुम्ही दररोज या ५ छोट्या उपायांचे पालन केले तर काही आठवड्यांत केसांची ताकद आणि लांबी दिसू लागेल. तथापि, आयुर्वेदिक पद्धती शरीराला आतून बरे करतात, म्हणून संयम आणि नियमितता सर्वात महत्वाची आहे. ■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



# वंदे मातरम्..!

भारतीय स्वातंत्र्याच्या
बलिदानाचा इतिहास
भावी पिढीसाठी
ठेवावयाचा असेल
जीवंत तर
वंदेमातरम्
म्हणत चला
भौ बिनधास्त!

हॅलो हॅलो २ काय म्हणता
वंदे मातरम् म्हणा ना
जानता अजानता का होई ना
राष्ट्रप्रेम प्रज्वलीत
होईल ना ..!

# भक्तिमार्ग

**दरवर्षी साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवामुळे आपल्याला विलक्षण ऊर्जा मिळते. ही ऊर्जा समाजशक्ती संघटित झाल्याची असते, मनातील सात्विक भाव जागृत झाल्याची असते, देवाच्या निकटच्या सहवासाने मिळालेल्या आत्मिक संतोषाची असते आणि मुख्य म्हणजे दैनंदिन समस्या, अडचणी काही क्षण का होईना बाजूला गेल्याने मिळणारी असते. पण आता गणरायाने या समस्या कायमच्या नष्ट कराव्या आणि चिरंतर समाधानाचा वर द्यावा.**

गणेशोत्सव अगदी उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. पुढल्या वर्षी लवकर या, असं म्हणत भावपूर्ण निरोप देताना मागच्या वर्षी केलेला आग्रह स्मरत यंदा गणराय आपल्या भेटीला येत आ-हेत! गणपतीचं आगमन दर वर्षीच एक नवं चैतन्य घेऊन येतं. हे दहा दिवस आनंद, मांगल्य, पावित्र्य, सद्भाव आदींनी भारलेले असतात. तसं पहायला गेलं तरी गणपती आले म्हणून नेहमीची व्यवधानं सुटत नसतात. नोकरी-धंद्याचा व्याप ताप, जीव गुदमरुन टाकणारी गर्दी, अनेकांचं उपद्रवमूल्य, आपली क्षणोक्षणी साथ करणाऱ्या चिंता-व्यग्रता-व्यस्तता या सर्वांसहच आपण गणेशाला सामोरं जातो. विक्रमादित्याच्या पाठकुळीवर बसलेल्या वेताळाप्रमाणे या चिंता आणि समस्या सदोदित आपल्यासोबत असतात. या दहा दिवसात ना देशातील वाता-वरण बदलतं ना जगातील. बदल होतो तो आपल्या अंत:करणात, आपल्या मनात आणि आपल्या भावनेत.

दिवसभर तापाने फणफणलेलं पोर नोकरीवरुन परतलेल्या आईने मायेने कुशीत घेताच विसावतं, वेदना असूनही तिच्या सानिध्यात त्याला वेदना सहन करण्याचं बळ मिळतं अगदी तेच बळ अशा उत्सवांमधून आपल्याला मिळत असतं. म्हणूनच या उत्सवाचं काऊंटडाऊन मनात सतत सुरु असतं. आता तर सोशल मीडिया, पोस्टर्सच्या माध्यमातून ही उत्सवाप्रतीची आतुरता, ही उलटगणती समाजपटलावरही पहायला मिळते. ङ्गबाप्पांना यायला उरले फक्त अमूक दिवसङ्ग अशा कॅची लाईन्स नकळत आपल्या भावनांशी तादात्म्य पावतात आणि गणरायाची सरबराई करण्यासाठी, त्याच्या स्वागताच्या सिद्धतेसाठी मनापासून तयारी सुरु होते. रात्रभर जागून केलेली घराची स्वच्छता, गणपतीच्या प्रतिष्ठापनेची, पूजेची समग्र तयारी, सजावट आणि देखाव्यांची पूर्वतयारी, दररोजच्या नेवैद्याची पूर्वतयारी ही चार भिंतीतली धांदल असतेच पण हे सगळं सांभाळून गृहसंकुलात पार पडणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवामध्ये योगदान देण्यासाठी, एखाद्या कामाची जबाबदारी पार पडण्यासाठीही दिवसातील कामाचे तास आपोआप वाढतात. एरवी दिवसभर काम करुन जीव इतका थकतो की काहीही नकोसं वाटतं. पण तेच गणपतीची तयारी म्हटलं की, अंगात दहा हत्तींचं बळ येतं. कुठून येतं हे बळ, कुठून मिळते इतकी ऊर्जा, कुठून येते ही शक्ती?

ही शक्ती या विशालकाय देवतेच्या रुपात, तिच्या क्षमतेत, सामर्थ्यात दडली आहे. काय नाही पिटूकल्या उंदरावर स्वार होऊन संचार करणाऱ्या या आद्यदेवतेकडे? तिच्याकडे क्षमता आहे त्याचप्रमाणे शक्यता आजमावून पाहण्याची वृत्तीदेखील आहे. तिच्याकडे प्रगाढ बुद्धिमत्ता आहेच पण ती रुक्ष, निरस नाही. शक्ती-बुद्धीची ही देवता ग्रंथाच्या प्रथम ओवीत, चरणात, पाठात, वंदिली जाते. त्याचप्रमाणे लोककलांमधूनही तिलाच प्रथम वंदन होतं. कोणत्याही मंगल कार्याच्या आरंभी वंदिला जाणारा हा गणेश एखाद्या लहानग्याच्या इवल्याशा पाटीवरही हलकेच विसावतो. कोणत्याही अक्षरातून, रेषेतून, आकृतीतून, जिनसातून, वस्तूंमधून साकारली जाणारी या देवतेची प्रतिमा समाजाला काही शिकवणारी आहेच त्याचप्रमाणे घडवणारीही आहे. म्हणूनच नवसाची, कडक देवता असा भीतीयुक्त दबदबा कमी झाला आणि ङ्गबाप्पाङ्ग अशी प्रेमळ साद समाजाने घातली तेव्हा जवळच्या नातलगाच्या आपुलकीच्या आवेशात जनसमुदायात येऊन बसला. सोसायटीतील कोपऱ्यांपासून महालांमधील प्रशस्त मखरांपर्यंत कुठल्याही वातावरणाचा स्वीकार करणारी, दहा दिवस लोकांबरोबर मजेत राहणारी, त्यांच्याबरोबर नाचणारी, गाणारी ही देवता आहे. म्हणूनच तिच्यासाठी आधी मनाचा गाभारा सजतो आणि नंतर देवळाराऊळांचा.

आताही गणराय येण्याच्या सिद्धतेत आहेत. वाजत-गाजत आणताना रितीप्रमाणे त्यांचे डोळे झाकले जातील. रेशमी वस्त्राने मुखमंडळ झाकून त्यांना घरात, मंडपात आणलं जाईल. आजूबाजूच्या लखलखाटात कदाचित गणपतीला आपल्यातील, समाजातील वैगुण्य दिसणार नाही अथवा दिसली तरी आपल्या आदरतिथ्याने भारावलेल्या अवस्-थेत तो याकडे दुर्लक्ष करेल असा गैरसमज असेल. पण डोळे झाकले तरी त्याची चाणाक्ष नजर प्रत्येक ठिकाणी पोहोचलेच. किंबहुना, ती पोहोचायला हवी. त्याने चांगलं ते बघावंच त्याचबरोबर वाईटही बघावं. मागच्या वर्षी त्याच्या साक्षीने प्रचारकी थाटात




दिलेली किती आश्वासनं पाळली गेली इथपासून वैयक्तिक पातळीवर सोडले गेलेले किती संकल्प तडीस गेले याचा लेखाजोखाही या देवतेने मांडावा.

काय बदललं हो गेल्या वर्षात? देशपा-तळीवर म्हणाल तर आज ड्रॅगन डोळे वटारुन उभा आहे. काश्मीरसारखं नंदनवन अतिरेक्यांच्या काळ्या कृत्यांमध्ये घुसमटतंय. शाळकरी पोरांच्या हातातले दगड पाहून ती पोलादी शरीरं घाबरत नसली तरी त्यातील हळवी मनं मात्र नक्कीच कातरं होत असतील. या वर्षी सीमेवर हौतात्म्य पत्करणाऱ्या वीर जवानांच्या सरणाला चूड लावणारे लहानगे आपण पाहिले. तरुण विधवांचा काळजाला घरं पाडणारा आक्रोश ऐकला. यात्रेकरुंच्या गाड्यांना झालेले भीषण अपघात पाहिले. यात्रेकरुंच्या गाड्यांवर झालेले गोळीबार, भीषण अपघात पाहिले. दहशतवादाचा भेसूर चेहरा जागोजागी, प्रांतोप्रांती दिसत राहिला. देशपातळीवर हा तणाव असताना वैयक्तिक पातळीवरील तणाव हाताळण्यात अपयशी ठरल्याने मृत्यूला कवटाळणारे अनेक जीवही आपण पाहिले. मृत्यू, मग तो नैराश्यग्रस्ततेमुळे, नापिकीमुळे, ताणामुळे, अनारोग्यामुळे, सेल्फीसारख्या नसत्या अगोचरामुळे... कशामुळे का आलेला असेना, तो जगण्यापेक्षा स्वस्त झालेला आपण पहात आहोत. पाच वर्षाचा लहानगा असो, पन्नास वर्षाचा प्रौढ असो वा पंचाण्णव वर्षाचा वृद्ध असो... जगण्याचा उबग सगळीकडेच बघायला मिळतोय.

आज कशाकशाचा ताण घेतोय आपण! मुलींवर होणाऱ्या अत्याचारांचा, विवाहितांच्या जाचाचा, मुलांच्या व्यसनाधीनतेचा, गळेकापू स्पर्धेचा, जीवनातून हरवलेल्या शांततेचा... आगामी दहा दिवसात जणू यातील कोणतेच प्रश्न नसल्याच्या आविर्भावात समाजाची वर्तणूक असेल. डीजेच्या भिंतींमध्ये रोजचं कण्हणं दबून जाईल. झुंडीने येणाऱ्या उत्साहल-हरीचे दोन-चार शिंतोडे कानावर पडतील. आरतीच्या चढ्या आवाजात रोजच्या संघर्षाचा खडखडाट काही काळ कानाआड ढकलला जाईल. पण नंतर काय? पहिले पाढे पंचावन्न! आता तरी गणरायानं उघड्या डोळ्यांनी हे सगळं पहावं. तो सुखकर्ता आहे, दु:खहर्ता आहे. दु:खाचं परिमार्जन करण्यासाठी तो येतो आहे. तेव्हा त्याने छत्राखालील गैरकृत्यांचा तरी समाचार घ्यावा. त्याचे विशाल कान सूक्ष्मातील सूक्ष्म आवाज टिपणारे आहेत. त्याने जनसामान्यांचा हा हुंकार ऐकावा. त्याचे डोळे लहान असले तरी दृष्टी विशाल आहे. त्याच्या दृष्टीने समाजातील विदारकता पहावी. त्याने ही क्षमता वापरावी, उत्सवमूर्ती असल्याचा परिपूर्ण आनंद लुटावा पण या उत्सवाच्या आड दडून पार पडणाऱ्या गैरकृत्यांचाही समाचार घ्यावा. चौसष्ट कलांच्या या अधिपतीने आजच्या काळात कलाकारांच्या समस्यांची दखल घ्यावी. गणांचा अधिपती असणाऱ्या गणपतीने केवळ मूषकाच्या कानात सांगितल्या जाणाऱ्या गाऱ्हाण्यांचाच नव्हे तर सर्वांच्या मनातील आक्रोशाचाही विचार करावा.

हे गणराया, तू आमचा आहेस. आम्ही तुझा मंडप बांधण्यासाठी खड्डे खणतो, पण त्यात अडखळून उताणे पडतो. तुझ्या रंजनासाठी ङ्गदिल धडकङ्ग गाणी वाजवतो पण आमचे कान बधीर होतात. नेत्रदीपक रोषणाई तुझ्यासाठी असते पण वीजेचा धक्का लागून आम्ही मरतो. तुझ्यासाठी रस्त्यावर उतरतो पण गर्दीत अडकलेल्या रुग्णवाहिकेमध्ये कोणाचा तरी प्राण जातो. शेवटी आम्ही हे सगळं तुझ्यासाठी करतो. त्यात आमचा स्वार्थ नाही, चूक तर नाहीच नाही. तू बुद्धी देणार तसे आम्ही वागणार. म्हणूनच आता तरी डोळे उघडून सगळं बघ. तू सद्बुद्धी देत असशील तर दुर्बुद्धीही तूच देतोच हे मान्य कर. सगळी जबाबदारी स्वत:च्या शिरी घे आणि दहा दिवस स्वत:ची काळजी घे...

भक्ती विशेष

---

# लक्षणं पढतमूर्खांची

समर्थ रामदासांनी विविध लक्षणं सांगितली आहेत. या लेखात आपण पढतमूर्खांची लक्षणं जाणून घेऊ. मागां सांगितली लक्षणें। मूर्खांआंगी चातुर्य बाणे। आतां ऐका शाहणे। असोनि मूर्ख। ।१।। तया नांव पढतमूर्ख। श्रोतीं न मनावें दु:ख। अवगुण त्यागितां सुख। प्राप्त होये।।२।। बहुश्रुत आणि वित्पन्न। प्रांजळ बोले ब्रह्मज्ञान। दुराशा आणि अभिमान। धरी, तो येक पढतमूर्ख।।३।। मुक्त क्रिया प्रतिपादी। सगुण भक्ती उछेदी। स्वधर्म आणि साधन निंदी तो एक पढतमूर्ख।।४।।



आपलेन ज्ञानेपणे। सकळांस शब्द ठेवणे। प्राणीमात्रांचे पाहे उणें। तो येक पढतमूर्ख।।५।। शिष्यास अवज्ञा घडे। कां तो संकटी पडे। जयाचेनि शब्दें मन मोडे। तो येक पढतमूर्ख।।६।।

समर्थ म्हणतात, शहाणे असूनही मूर्खासारखे वागणाऱ्या लोकांना पढतमूर्ख असं म्हटलं जातं. अशी काही लक्षणं आपल्या ठिकाणी आहेत असं वाटलं तरी श्रोत्यांनी दु:ख मानू नये. अवगुणांचा प्रयत्नपूर्वक त्याग केला तर सुख लाभेल. त्यामुळे श्रोत्यांनी वृथा चिंता करू नये, असं समर्थ सांगतात. पढतमूर्खाची लक्षणं विषद करताना ते म्हणतात, जो बहुश्रुत आणि विपन्न आहे तो प्रांजळपणे ब्रह्मज्ञान कथन करतो पण ज्याच्या मनात दुराशा आणि अभिमान असतो तो एक पढतमूर्ख होय. जो सगुण आणि भक्तीचा उच्छाद करतो. स्वधर्म आणि साधनांची निंदा करतो तो पढतमूर्ख मानला जातो.

दासबोध

जो माणूस स्वत:चं ज्ञान पाजळतो, इतरांना बोल लावतो. समस्त प्राणीमात्रांचे वाईट इच्छितो तो पढतमूर्ख आहे. ज्याच्यामुळे शिष्याला अवज्ञा घडते, शिष्य संकटात पडतो, ज्याच्या शब्दांनी मन मोडतं तो पढतमूर्ख असतो. समर्थ अखेरीस म्हणतात की, परम मुर्खामाजी मूर्ख। जो संसारी मानी सुख।। या संसारदु:खा ऐसे दु:ख। आणिक नाहीं।। ४०।। तेचिं पुढे निरूपण। जन्मदु:खाचे लक्षण। गर्भवास हा दारूण। पुढे निरूपिला।।४१।। संसारात सुख मानणारी व्यक्ती पढतमूर्खांमध्ये मूर्ख मानली जाते. या संसारदु:खासारखे दुसरे कोणतेही दु:ख नाही. जन्मदु:खाच्या निरूपणाबद्दल पुढे वर्णन केलं आहे. गर्भवास हा अत्यंत दारूळ असतो.

पुढच्या समासांमध्ये याचं निरूपण करण्यात आलं आहे.

---

# महालक्ष्मीचा फोटो घेताना...



शुक्रवार हा महालक्ष्मीचा वार मानला जातो. या दिवशी अनेकजण महालक्ष्मीचं व्रत करतात. या दिवशी लक्ष्मीची पूजा केल्याने धन आणि वैभवाची प्राप्ती होते असं म्हटलं जातं. शुक्रवारी हत्त-ीची मूर्ती घरी आणणं शुभ मानलं जातं. या माध्यमातून आपल्या बऱ्याच मनोकामना पूर्ण होऊ शकतात. देवी लक्ष्मीला हत्ती खूप प्रिय आहे. या दिवशी हत्ती घरी आणला तर देवी प्रसन्न होते, असं मानतात. त्यामुळे घरात असलेल्या लक्ष्मीदेवीच्या चित्रात हत्ती असणं गरजेचं आहे. हत्ती नसलेली देवीची प्रतिमा अपूर्ण आहे, असं मानलं जातं. म्हणूनच पूजनासाठी लक्ष्मीची प्रतिमा विकत घेताना काही गोष्टी लक्षात घेणं गरजेचं आहे. महालक्ष्मी ही वैभव आणि समृद्धीची देवता आहे. ती प्रसन्न झाली तर आपण वैभवसंपन्न आयुष्य जगू शकतो. लक्ष्मीची तसबीर घेताना त्यात देवीच्या डाव्या आणि उजव्या बाजूला हत्ती असायला हवेत. तसंच हे हत्ती वाहत्या पाण्यात उभे असणं गरजेचं असतं. त्यातच हत्तीच्या सोंडेत वाहत्या पाण्याचा कलश असेल तर ते अधिक शुभ मानलं जातं. घरात कुबेराचा फोटो किंवा मूर्ती असेल तर देवी लक्ष्मी प्रसन्न होते. कुबेर हा जगातल्या धनसंपत्तीचा रक्षक मानला जातो. कुबेराची मूर्ती असलेलं स्थान स्वच्छ असायला हवं.

जाणून घ्या

लक्ष्मी आणि कुबेराच्या पाऱ्याच्या मूर्ती अधिक लाभदायी मानल्या जातात. लक्ष्मी आणि गणपतीची चांदीची मूर्तीही घेता येईल. देवी लक्ष्मीच्या चांदीच्या पादुकाही मिळतात. या पादुका अत्यंत पवित्र मानल्या जातात. पादुका घरात ठेवल्याने देवी लक्ष्मीची कृपा राहते असं म्हटलं जातं.

---

# देवाला नका देऊ दोष!

परमेश्वराबद्दल तक्रार करणारे अनेकजण असतात. काहीही खुट्ट झालं की देवाला दोष देऊ लागतात. आयुष्यात एखादी अप्रिय घटना घडली तरी देवाला दोषी धरलं जातं आणि परमेश्वराने आजवर जे दिलं त्याकडे साफ दुर्लक्ष केलं जातं. अशा लोकांसाठी कृष्ण आणि सुदाम्याची ही कथा प्रेरक ठरू शकते. कृष्ण आणि सुदामा यांच्या मैत्रीबद्दल आपण बरंच ऐकून आहोत. या दोघांमध्ये प्रचंड प्रेम होतं. कृष्ण आणि सुदामा कायम एकत्र असत. कोणतंही काम ते एकत्रच करत असत. एकदा दोघं वनसंचारासाठी गेले होते पण रस्ता विसरले. दोघेही उपाशी होते. ते एका झाडाजवळ पोहोचले. त्या झाडावर एकच फळ होतं. कृष्णाने घोड्यावर चढून ते फळ तोडलं. त्याचे सहा तुकडे केले आणि सवयीप्रमाणे पहिला तुकडा सुदामाला दिला. सुदामाला फळ खूप आवडलं. तो कृष्णाला म्हणाला, असं फळ आजवर कधीही खाल्लं नव्हतं. अजून एक तुकडा दे ना. अशा प्रकारे



सुदामाने श्रीकृष्णाकडून पाच तुकडे मागितले. आता अखेरचा तुकडाही त्याला हवा होता. मग मात्र कृष्ण वैतागला. तो म्हणाला, मी सुद्धा उपाशी आहे. माझं तुझ्यावर प्रेम आहे पण तुला काहीही वाटत नाही. असं म्हणून कृष्णाने फळाचा तुकडा तोंडात टाकला. तुकडा तोंडात टाकताच त्याने तो थुंकून टाकला. ते फळ खूपच कडू होतं. कृष्ण सुदाम्याला म्हणाला की, तुला वेड तर नाही लागलं? एवढं कडू फळ तू कसं खाल्लं? यावर सुदाम्याने फार छान उत्तर दिलं. तो म्हणाला, ज्या हातांनी आजवर इतकी गोड फळं दिली त्याने दिलेल्या एका कडू फळाची तक्रार कशी करू? म्हणून मी हे फळ खाल्लं. तुला कडू फळ खावं लागू नये, यासाठी मी हे केलं. सुदाम्याच्या या उत्तराने कृष्ण खूपच भारावून गेला. आयुष्यात सगळं काही मनासारखं घडत असताना एखादी गोष्ट चुकीची घडली तरी देवावर खापर फोडणाऱ्यांनी या कथेतून बोध घ्यायला हवा.

बोध

---



# कृतज्ञता व्यक्त करू या

भारत हा कृषीप्रधान देश मानला जातो. सुजलाम सुफलाम अशी ही आपली मातृभूमी. हिरवी हिरवी शेतं आपल्याला खुणावत असतात. देशातल्या नागरिकांना अन्न मिळावं यासाठी शेतकरी झटत असतो. याच शेतकऱ्याची इमानेइतबारे साथ देणारा प्राणी म्हणजे बैल. भारतीय संस्कृतीत प्राण्यांना मानाचं स्थान आहे. प्राण्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारे अनेक सण आपण साजरे करतो. नागपंचमीला नागाची पूजा करतो तर पोळा हा सण खास बैलांचा. श्रावणातल्या अमावस्येला बैलपोळा असतो. या दिवशी शेतकरीवर्ग बैलाची पूजा करतो. बैलाने आजवर दिलेल्या साथीप्रती आदरभाव व्यक्त करण्याचा हा छोटासा प्रयत्न असतो. भारताने कितीही प्रगती केली असली, उद्योग-व्यवसाय वृद्धींगत होत असले तरी आपली अर्थव्यवस्था आजही कृषीप्रधान आहे. देशाची मोठी लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. शेती आणि दुधदुभती जनावरं हेच त्यांच्या उत्पन्नाचं साधन आहे. खरं तर शेतकरी हा राजा असायला हवा. म्हणूनच त्याला बळीराजा असं म्हटलं जातं. शेती हा उत्तम व्यवसाय होऊ शकतो. लोकांचं पोट भरण्याचं पुण्य हा व्यवसाय देतो. अन्नधान्य पिकलंच नाही तर आपण खाणार तरी काय, असा प्रश्न पडायला हवा.

आज आपल्याकडच्या शेतकऱ्याची दुरवस्था झाली आहे. नापिकी, कर्जबाजारीपणा, दुष्काळ यामुळे गावोगावचा शेतकरी त्रस्त झाला आहे. पावसाआधी आभाळाकडे डोळे लावून बसलेला शेतकरी आपल्याला दिसतो. आजचा तरूण शेतीकडे वळत नाही. शेतीला वलय नसल्याचं कारण यामागे दिलं जातं. पण प्रत्यक्षात शेतीसारखा वलयांकित व्यवसाय नाही. भारतातला शेतकरी हा प्रामुख्याने मान्सूनवर अवलंबून असतो. पण अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि मेहनत यांच्या जोरावर नवी पिकं घेणारे शेतकरीही आहेत. वैराण जमिनी-वरही अनेकांनी बाग फुलवली आहे. निरनिराळी पिकं घेतली जात आहेत. अशी अनेक उदाहरणं आपल्या आसपास पहायला मिळतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी खचून न जाता मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर शेत फुलवायला हवं.


सण-उत्सव

बैलाकडून आपल्याला हा धडा घेता येईल. जमीन कितीही नापीक असली तरी तो मेहनत करणं सोडत नाही. मालकाच्या खांद्याला खांदा लाऊन तो काम करत असतो. शेवटपर्यंत तो मालकाची साथ देतो. कधीही हार मानत नाही. त्यामुळे पोळ्याच्या निमित्ताने बैलाची पुजा करण्यासोबतच त्याच्या अंगचे काही गुणही आपण घ्यायला हवे. आपल्या घरच्या रांगड्या बैलाची साथ असली की काहीही अशक्य नसतं. कोणत्याही परिस्थितीतून बाहेर पडता येतं, हे प्रत्येकाने लक्षात ठेवायला हवं. शेतीकडे सकारात्मक दृष्टीकोनातूनच पहायला हवं. शेतकरी टिकला तरच आपण टिकणार आहोत, हे प्रत्येकाने लक्षात घ्यायला हवं. यासाठी शेतकऱ्याच्या कल्याणाच्या योजना राबवायला हव्यात. सरकार, जनता आणि शेतकरी एकत्र आले तर बळीराजाचं राज्य यायला वेळ लागणार नाही.

---

# कोण होतं यशस्वी?

जगात प्रत्येक व्यक्तीला यशस्वी व्हायचं आहे पण अपयशाच्या भीतीने अनेकजण पुढे जात नाहीत. अयशस्वी होण्यामागे नशीब नसतं तर त्याला आपण स्वत:च जबाबदार असतो. आर्य चाणक्याने काही गोष्टी नमूद केल्या आहेत, काही नियम सांगितले आहेत. या नियमांचं पालन करणारी व्यक्ती कधीही अयशस्वी होत नाही.



* माणसाने आपले हात, कान आणि डोळे उघडे ठेवायला हवेत. म्हणजे आपल्या आसपास घडणाऱ्या घटनांकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. माणसाने जागरूक असायला हवं.
* माणसाकडे ज्ञान असायला हवं. पण फक्त पुस्तकी ज्ञान असून भागत नाही. प्रत्येक विषयाची सखोल माहिती म्हणजे ज्ञान, असं आर्य चाणक्य म्हणतात. चांगलं आणि वाईट याची ओळख माणस-ाला असायला हवी. आयुष्याकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक असेल तर कधीही अपयश येत नाही.
* माणसाने थोडा तरी धनसंचय करायला हवा. वाईट वेळ कधी येईल हे सांगता येत नाही. त्यामुळे आपल्याकडच्या सर्व संपत्तीचा व्यय करण्याऐवजी थोडा पैसा जवळ ठेवायला हवा.
* माणसाकडे आत्मविश्वास असायला हवा. आत्मविश्वास असला की सगळं काही शक्य होतं. माणसाने स्वत:वर विश्वास ठेवायला हवा. आत्मविश्वास असलेल्या व्यक्तीला अपयश येत नाही. स्वत:वर पूर्ण विश्वास असलेली व्यक्ती कोणत्याही वाईट परिस्थितीतून बाहेर पडू शकते.
* अनेकदा आपल्याला केलेल्या मेहनतीच्या तुलनेत खूप कमी यश मिळतं. एवढी मेहनत करून काय उपयोग, असा प्रश्न आपल्याला पडतो पण माणसाने सतत मेहनत करायला हवी, असं चाणक्य सांगतात. मेहनतीकडे काही काळ दुर्लक्ष होऊ शकतं पण मेहनतीला पर्याय नाही. मेहनती व्यक्तीला अपयशाचं तोंड पहावं लागत नाही.

चाणक्यनीती

---

# गुरूवायूरप्पन मंदिर

भगवान श्रीकृष्ण हा विष्णूचा अवतार. भारताच्या उत्तरेकडच्या राज्यात श्रीकृष्णाची अनेक मंदिरं आ-हेत. दक्षिणेतही श्रीकृष्णाची आराधना केली जाते. केरळमधल्या गुरूवायूर या ठिकाणी श्रीकृष्णाचं महत्त्वाचं मंदिर आहे. या स्थानाला दक्षिण द्वारका असंही संबोधलं जातं. हे स्थान केरळमधल्या प्रसिद्ध तीर्थस्थानांपैकी एक आहे. गुरूवायूर हे त्रिशूर जिल्ह्यातलं एक गाव आहे. या मंदिरासंबंधी एक आख्यायिका सांगितली जाते. ती अशी की, देवांचे गुरू बृहस्पती यांना कलियुगाच्या सुरूवातीला भगवान श्रीकृष्णाची एक मूर्ती सापडली. मग वायूदेवाच्या मदतीने त्यांनी त्याच स्थानी या मूर्तीची स्थापना केली. त्यामुळे या स्थानाचं नाव गुरूवायूर पडल्याचं बोललं जातं.



गुरूवायूर हा शब्द तीन शब्द मिळून बनला आहे. गुरु म्हणजे देवगुरू बृहस्पती. वायू म्हणजे वायूदेव आणि ऊर हा मल्याळम भाषेतला शब्द आहे. ऊर म्हणजे भूमी. गुरूवायूर म्हणजे गुरू, वायू आणि भूमी. या मंदिराला गुरूवायूरप्पन मंदिर असं म्हटलं जातं. कृष्णमूर्ती हे इथलं खास आकर्षण. ही मूर्ती लोभसवाणी आहे. या तिला चार हात आहेत. एका हातात शंख, दुसऱ्या हातात सुदर्शनचक्र तर तिसऱ्या हातात बासरी आणि चौथ्या हातात कमळ आहे. या मंदिराला ङ्गभूलोक वैकुंठमङ्ग असंही म्हणतात. कोचीनच्या विमानतळापासून ८८ किलोमीटर अंतरावर हे मंदिर वसलं आहे. उत्सवकाळात गुरूवायूर मंदिर छान सजवलं जातं. देशभरातले भाविक या ठिकाणी येत असतात. श्रीकृष्णाच्या भक्तांसाठी हे स्थान अत्यंत महत्त्वाचं आहे.

तीर्थक्षेत्र

### क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आदिवासी गावांमध्ये योजनांचा जागर

# १५ ते १७ नोव्हेंबर कालावधीत महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

भारतीय स्वातंत्र्यासाठी आदिवासी समाजात क्रांतीची बिजे पेरुन ब्रिटीशांना ललकारी देणारे क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती निमित्त नागपूर येथे दिनांक १५ ते १७ नोव्हेंबर या तीन दिवसीय कालावधीत भव्य जनजातीय गौरव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. याचबरोबर राज्यातील सूमारे ४ हजार ९७५ आदिवासी गावांमध्ये शासनाच्या सर्व विभागामार्फत समग्र विकासासाठी एक व्यापक मोहीम राबविली जात असल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी दिली.



## डॉ. अशोक वुईके यांची माहिती

नागपुरच्या मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलात राज्यपातळीवरील होणाऱ्या या जनजातीय गौरव महोत्सवाचे उद्घाटन १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या समारंभास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची विशेष उपस्थिती तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, वित्त राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आदिवासी विकास राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार श्यामकुमार बर्वे यांची प्रमुख उपस्थिती राहील. याचबरोबर आमदार रवींद्र चव्हाण विशेष आमंत्रित आहेत. याचबरोबर विधान परिषद सदस्य सर्वश्री अभिजीत वंजारी, सुधाकर अडबाले, डॉ. परिणय फुके, कृपाल तुमाने, संदीप जोशी, विधानसभा सदस्य सर्वश्री डॉ. नितीन राऊत, कृष्णा खोपडे, प्रविण दटके, मोहन मते, विकास ठाकरे, समीर मेघे, चरणसिंग ठाकूर, आशिष देशमुख, संजय मेश्राम यांची उपस्थिती राहील. राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, आदिवासी विभागाचे सचिव विजय वाघमारे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांची कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती राहील.

दि. १६ नोव्हेंबर रोजी चेतना परिषद तसेच आदीकर्मयोगी अभियान, प्रधानमंत्री जनमन, धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान कार्यशाळा संपन्न होणार असून याला केंद्रीय जनजातीय राज्यमंत्री दुगार्दास उईके, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन लाभेल. याचबरोबर राज्यसभा सदस्य सुमेर सिंह सोलंकी, राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाचे माजी अध्यक्ष हर्ष चौहान, सामाजिक कार्यकर्ते चैतराम पवार, महु येथील डॉ. बी.आर. आंबेडकर सामाजिक विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. रामदास आत्राम, जनजातीय कार्य मंत्रालयाच्या संचालिका दीपाली मासिरकर, आदिवासी विकास आयुक्त लिना बनसोड, लक्ष्मण मडकाम, जनजाती विशेषज्ज्ञ दीपमाला रावत आदी मान्यवर या कार्यशाळेत मार्गदर्शन करतील.

१७ नोव्हेंबर रोजी राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण कार्यक्रम व युवक-युवती सम्मेलनाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या सम्मेलनास केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय आदिवासी विकास मंत्री जुएल ओराम, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांची प्रमुख उपस्थिती राहील.

याचबरोबर मध्य प्रदेश येथील जनजातीय कार्य मंत्री कुवर विजय शाह, मध्य प्रदेशच्या लोक स्वाथ्य यांत्रिकी विभागाच्या मंत्री संपतिया उईके, खासदार फग्गनसिंह कुलस्ते, माजी केंद्रीय राज्यमंत्री भारती पवार, माजी महापौर मायाताई ईवनाते, खासदार समीर उराव, सुरेखाताई थेतले, रंजना कोडापे, कविता राऊत हे मार्गदर्शन करतील. या कार्यक्रमाला मुख्य सचिव राजेश कुमार व आदिवासी विभागाचे सचिव विजय वाघमारे यांची विशेष उपस्थिती राहील. या कार्यक्रमास अधिकाधिक संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे आयुक्त दीपा मुधोळ मुंडे, आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड, अपर आयुक्त आयुषी सिंह यांनी केले आहे.

### सीआरपीएफ उप महानिरीक्षकाच्या

# मुलीची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :



अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेतून (एम्स) वैद्यकीय अभ्यासक्रमाचे पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या आणखी एका विद्यार्थीनीने सायंकाळी तिच्या सदनिकेत गळफास लावून आत्महत्या केली. बुधवारी सायंकाळी हा प्रकार निदर्शनास आल्याने एम्समध्ये खळबळ उडाली आहे. समृद्धी कृष्णकांत पांडे (२५) असे या विद्यार्थिनीचे नाव आहे. ती पुणे येथील केंद्रीय राखीव पोलीस दलाचे महानिरीक्षक कृष्णकांत पांडे यांची मुलगी आहे.

एम्समध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या त्वचारोग विभागात पहिल्या वषार्ची विद्यार्थिनी असलेली समृद्धी ही नागपुरातील शिव कैलाश येथील मंजिरा अपार्टमेंटमध्ये राहत होती. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एम्समध्ये त्वचारोगशास्त्रात प्रवेश घेतल्यापासून ती तणावाखाली वावरत होती. या शाखेतील भविष्यातल्या संधीवरून तिच्या मनात भीती निर्माण झाली होती. १२ नोव्हेंबरला सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास ती खोलीत गेली. तिची मैत्रिण सुहानी संजय जैस्वाल ही सदनिकेत परतली तेव्हा दरवाजा आतून बंद होता. सुहानीने पाठीमागच्या बाजूने खोलीत प्रवेश केला असता, तिला समृद्धी छताच्या पंख्याला लटकलेली आढळली. तिने तत्काळ महाविद्यालय प्रशासन आणि पोलिसांना माहिती दिली. सोनेगाव पोलिसांनी घटनास्थळ गाठत पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवला.

या आत्महत्येच्या घटनेमुळे नागपूरच्या एम्समध्ये खळबळ उडाली आहे. एवढी हुशार, सभ्य आणि आशादायक विद्यार्थिनी टोकाचे पाऊल उचलल्याने शैक्षणिक वर्तुळाला धक्का बसल. तिच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी तिच्या वर्गमित्रांकडे विचारपूस सुरू केली आहे. काही महिन्यांपूर्वी चरक वसतिगृहाच्या खोली क्रमांक ९०९ मध्ये संकेत पंडितराव दाभाडे (२२) या प्रशिक्षणार्थी डॉक्टरने गळफास लावून आत्महत्या केली होती.

# विचारा इस्लाम पोस्टर

## पालकमंत्र्यांचे चौकशीचे आदेश

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १३ :



अमरावती शहरात लावण्यात आलेल्या 'विचारा इस्लाम' या पोस्टरची महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांना या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

पालकमंत्री बावनकुळे यांनी पोलीस आयुक्तांकडून यासंदभार्तील सद्यस्थितीची माहिती घेतली. अमरावतीचे सामाजिक वातावरण कोणत्याही परिस्थितीत बिघडता कामा नये, असे निर्देश त्यांनी दिले. असे प्रयत्न करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी, असेही ते म्हणाले. काही महिन्यांपूर्वी अमरावतीमध्ये 'आय लव्ह मोहम्मद' अशा आशयाचे पोस्टर लावण्यात आले होते. आता 'विचारा इस्लाम' आशयाचे पोस्टर दिसत आहेत, हा प्रकार अयोग्य असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले. शहरातील पंचवटी चौक परिसरात हा उपद्रव झाल्याचे समोर आले आहे. या पोस्टरखाली एक टोल-फ्री नंबर असून, तो हैदराबाद आणि चेन्नई येथून ऑपरेट होत असल्याची माहिती मिळाली आहे. पोस्टरवर 'आयसीसी' असे लिहिलेले असल्याने, त्यामागील उद्देशाबाबतही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

# भाजप आमदार बंटी भांगडिया यांना धक्का

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. १३ :



### समर्थकाचा काँग्रेसमध्ये प्रवेश

चिमूर नगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आमदार कीर्तीकुमार उर्फ बंटी भांगडिया यांना धक्का बसला आहे. त्यांचे कट्टर समर्थक तथा भाजप अल्पसंख्यांक मोचार्चे सरचिटणीस जुनेद खान, माजी नगराध्यक्ष संतोष गोहणे यांनी गुरूवारी मुंबईत काँग्रेस विधीमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुक जाहीर झाल्यापासून भाजप व काँग्रेस या दोन्ही पक्षात पक्ष प्रवेशांला जोर आला आहे. मात्र काँग्रेस नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी यात आघाडी घेतली आहे. मूल येथे माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार समर्थक माजी सभापती प्रशांत समर्थ, एकता समर्थ यांचा काँग्रेस प्रवेश घडवून आणल्यानंतर आता चिमूर विधानसभा मतदार संघात भाजप आमदार बंटी भांगडिया यांना धक्का दिला आहे.

भांगडिया यांचे कट्टर समर्थक तथा भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे महामंत्री जुनेद खान, चिमूरचे माजी नगराध्यक्ष संतोष रोहणे, सतीश वनकर यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्ष प्रवेशाचा सोहळा पार पडला. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सतीश वारजूकर यांच्यासह काँग्रेसचे अनेक नेते उपस्थित होते. विशेष म्हणजे काही महिन्यांपूवी आमदार बंटी भांगडीया यांनी ब्रम्हपुरीच्या माजी नगराध्यक्ष रिता उराडे, विलास विखार या दोन वडेट्टीवार समर्थकांचा भाजप प्रवेश घडवून आणला होता. आता वडेट्टीवार यांनी जुनेद खान यांना काँग्रेस प्रवेश घडवून आणत भांगडिया यांच्यावर मात करण्याचा प्रयत्न केला आहे.

## जवाहर अभ्यासिका उदघाटन सोहळा आज

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

जवाहर विद्यार्थी गृह, अभ्यासिका, नंदनवन" येथे उदघाटन सोहळा शुक्रवार दि.१४ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजता जवाहर विद्यार्थी गृह, नंदनवन, नागपूर येथे करण्यात येणार आहे. UPSC/MPSC/BANK OFFICER/CA अशा किंवा तत्सम परिक्षांची तयारी करण्यासाठी जे विद्यार्थी शांत वातावरणात अभ्यास करु इच्छितात, त्यांचे साठी जवाहर विद्यार्थी गृहाच्या नंदनवन सभागृहात अतिशय अल्प दरात "जवाहर अभ्यासिका" सुरु करण्यात येत आहे. सर्व नागरीकांनी उपस्थित राहावे, अशी माहिती जवाहर विद्यार्थी गृह कार्यकारी मंडळ यांनी दिली आहे.

## आदिनाथ कोठारेच्या आगामी डिटेक्टिव धनंजय वेब सीरिजचा मुहूर्त संपन्न

लोकरंजन

बॉलिवुड मध्ये बड्या प्रोजेक्ट्सचा भाग होत असताना सध्या अभिनेता आदिनाथ कोठारे हा चर्चेत आहे. एकीकडे निर्मिती संस्था असलेल्या कोठारे व्हिजनची नशीबवान ही मालिका आणि आता पुन्हा सुरू होणारे नवीन काम यात आदिनाथ व्यस्त असलेला दिसतोय.

काही दिवसांपूर्वी आदिनाथने एक खास गिफ्ट प्रेक्षकांना देऊन नव्या प्रोजेक्ट ची घोषणा केली होती. आदिनाथ लवकरच एका वेब सीरिज मधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचं देखील समजलं आणि त्याचा प्रोमो देखील समोर आला होता. या बहुचर्चित वेब सीरिजचा मुहूर्त नुकताच संपन्न झाल्याचं त्याने सोशल मीडिया वर सांगितलं. झी ५ मराठी ओरिजनल अंतर्गत लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत असलेल्या डिटेक्टिव धनंजय मध्ये तो एका डिटेक्टिवच्या भूमिकेत बघायला मिळणार असून सोबतीला आदिनाथ या नव्या वेब सीरिजसाठी अभिनेता आणि निर्माता या दोन्ही भूमिका बजावताना दिसणार आहे. मुंबईत डिटेक्टिव धनंजय या वेब सीरिजचा मुहूर्त संपन्न झाला आणि वेब सीरिजच्या शूटला सुरुवात झाली आहे. झी ५ वर ही वेब सीरिज लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचं कळतंय. ■ ■ ■



## लास्ट स्टॉप खांदा'तून उलगडणार प्रेमाचा इमोशनल कॉमेडी ड्रामा




सध्या जोरदार चर्चेत असलेल्या 'लास्ट स्टॉप खांदा...' या चित्रपटातून प्रेमाचा इमोशनल, कॉमेडी ड्रामा उलगडणार आहे. उत्तम लेखन, अभिनय, संगीत असलेला, पुरेपूर मनोरंजन करणारा हा चित्रपट २१ नोव्हेंबरला प्रदर्शित होणार असून, चित्रपटाचा ट्रेलर लाँच करण्यात आला आहे.

शिवम फिल्म क्रिएशन सिग्नेचर ट्यून्स, स्नेहा प्रॉडक्शन्स यांनी ₹लास्ट स्टॉप खांदा... ₹ प्रत्येकाच्या प्रेमाची गोष्ट या चित्रपटाची निर्मिती केली आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन विनित परुळेकरनी केलं आहे. चित्रपटात अभिनेता श्रमेश बेटकर अभिनेत्री जुईली टेमकर, निखिल बने, मंदार मांडवकर, शशिकांत केरकर, सुदेश जाधव, महेश कापरेकर, प्रियांका हांडे, डॉ. सचिन वामनराव, गणेश गुरव, निशांत जाधव, गिरीश तेंडुलकर, जयश्री गोविंद अशी तगडी स्टारकास्ट आहे. प्रत्येकाच्या प्रेमाची गोष्ट 'लास्ट स्टॉप खांदा' या चित्रपटातून पहायला मिळणार आहे. नावापासूनच चर्चेत असलेल्या या चित्रपटातलं 'शालू झोका दे गो मैना'सह टायटल साँग, टीजरला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. एका तरुणाचं त्याच्या लहानपणापासून एका मुलीवर प्रेम असतं, पण ते प्रेम यशस्वी झालेलं नसतं. मात्र, त्या मुलीचं तिच्या प्रियकराशी ब्रेकअप होताच, हा तरुण पुन्हा एकदा तिच्या अनेक वर्षांनी आयुष्यात आपलं स्थान शोधण्याचा प्रयत्न करतो. या प्रयत्नात तो यशस्वी होतो की नाही याची मनोरंजक गोष्ट लास्ट स्टॉप खांदा या चित्रपटात पहायला मिळणार आहे. ■ ■ ■

## भारताचा मूळ सुपरहिरो अखेर पॉकेट एफएमवर परतला

ऑडिओ सिरीज प्लॅटफॉर्म पॉकेट एफएमने देशातील सर्वात प्रिय सुपरहिरोला पुन्हा जिवंत केले आहे. ४० भागांच्या नवीन ऑडिओ मालिकेसह या आख्यायिकेला पुनरुज्जीवित करत, शक्तीमान रिटर्न्स ही एक जुनाट पण समकालीन पर्यावरणीय थ्रिलर आहे, ज्याला शक्तीमानचे मूळ निर्माते आणि चेहरा मुकेश खन्ना यांनी पाठिंबा दिला आहे.

पॉकेट एफएमवर सर्व वापरकर्त्यांसाठी आता केवळ आणि विनामूल्य स्ट्रीमिंग होणारी ही मालिका, नवीन पिढीसाठी भारतातील सर्वात प्रिय सुपरहिरोला पुन्हा परिभाषित करते, जुनाट आठवणी, उद्देश आणि सिनेमॅटिक ध्वनी डिझाइन यांचे मिश्रण करून एक तल्लीन कथाकथन अनुभव तयार करते जे पूर्वीच्या कोणत्याही गोष्टींपेक्षा वेगळे आहे.



यावेळी, शक्तीमानचे ध्येय वाईटाशी लढण्यापलीकडे जाते. शक्तीमान रिटर्न्स मध्ये, तो अशा शत्रूचा सामना करतो जो पूर्वी कधीही नव्हता, मानवतेचा स्वतःचा लोभ आणि निसर्गाचे त्याचे बेपर्वा शोषण. त्याचा शत्रू, एकेकाळी संतुलनाचे रक्षक, महातत्त्व, कोणत्याही मार्गाने पृथ्वीची सुसंवाद पुनर्संचयित करण्यासाठी दृढ असलेल्या भ्रष्ट शक्तीमध्ये बदलला आहे.

जगाला वाचवण्यासाठी, शक्तीमानला पाच गूढ रत्ने, तत्वांचे मनी गोळा करण्यासाठी आणि खरी शक्ती करुणेत आहे हे शोधण्यासाठी एक शोध सुरू करावा लागेल, सिनेमॅटिक साउंडस्केप्सने भरलेली, ही मालिका जवळजवळ १० तासांचे ॲड्रेनालाईन, भावना आणि नैतिक जागृती दाखवते. ■ ■ ■



## प्रथमेश परब आणि पॅडी कांबळेच्या हॉरर कॉमेडी 'हुक्की'चा फर्स्ट लुक प्रदर्शित

हॉरर-कॉमेडीपटांनी नेहमीच रसिकांना भुरळ घातली आहे. चार मित्रांची गोष्ट सांगणारा 'हुक्की' हा आगामी मराठी चित्रपटही क्षणाक्षणाला प्रेक्षकांची उत्कंठा वाढविणारा आहे.

'हुक्की'च्या पहिल्या पोस्टरनंतर या चित्रपटाचा फर्स्ट लुक नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. दमदार कलाकारांची फौज आणि प्रवाहापेक्षा वेगळा विषय असल्याने 'हुक्की'च्या फर्स्ट लुकने प्रदर्शित झाल्यापासूनच रसिकांचे लक्ष वेधले आहे. सोशल मीडियावर 'हुक्की'च्या फर्स्ट लुकची जोरदार चर्चा रंगू लागली आहे.

हिंदी सिनेसृष्टीतील आघाडीचा अभिनेता वरुण धवनने 'हुक्की'चा फर्स्ट लुक आपल्या सोशल मीडियावर शेअर केला आहे. कथालेखनासोबतच 'हुक्की'चे दिग्दर्शन नितीन रोकडे यांनी केले आहे. 'हुक्की'चा फर्स्ट लुक खऱ्या अर्थाने रसिकांचा उत्साह वाढविणारा आहे. कावळ्याचा लालभडक डोळा उघडतो आणि फर्स्ट लुकची सुरुवात होते. त्यानंतर समुद्रकिनारी कोळी बांधव होडी ओढत असल्याचे दृश्य पाहायला मिळते. या दृश्यामागोमाग तीन तरुण आणि एक तरुणी यांची चौकडी चालत येत असल्याचे दिसते. त्यांना फोर लूझर्स असे संबोधले गेले आहे. त्यानंतर एक भयावह रात्र सुरू होते. या रात्री चौघेही काहीशा विचित्र परिस्थितीत अडकतात.

फर्स्ट लुक पाहिल्यावर 'हुक्की' या हॉरर कॉमेडीपटात प्रवाहापेक्षा वेगळे कथानक पाहायला मिळणार असल्याची जाणीव होते. महाराष्ट्राचा लाडका अभिनेता प्रथमेश परब आणि विनोदाचा बादशाह पंढरीनाथ कांबळे उर्फ पॅडी या चित्रपटात एकत्र झळकणार आहेत. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

### रेल्वेतून पडून काँग्रेस पदाधिकारी

# डॉ. सत्येंद्र भुसारींचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
नाशिक, दि. १३ :



चिखली तालुका काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष, बाजार समितीचे माजी सभापती आणि पैठण विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रभारी डॉ. सत्येंद्र भुसारी यांचे बुधवारी सायंकाळी कसारा रेल्वे स्टेशनजवळ झालेल्या अपघातात दुर्दैवी निधन झाले. या घटनेने चिखली तालुका तसेच संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ नोव्हेंबर रोजी पक्षाची बैठक संपल्यानंतर डॉ. भुसारी हे मुंबईवरून चिखलीकडे परत येत होते. सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास नाशिकजवळील कसारा घाटात धावत्या रेल्वेतून पडल्याने त्यांचा मृत्यू झाला. अपघातात डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना तात्काळ नाशिक येथील रुग्णालयात नेण्यात आले; मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. संबंधित रेल्वेगाडी कासारा स्टेशनवर थांबत नसल्याने नेमका अपघात कसा घडला? याचा तपास पोलिस करत आहेत.

डॉ. भुसारी यांनी मराठा मराठा सेवा संघाच्या माध्यमातून सामाजिक कायार्ची वाटचाल सुरू करत समाजसेवेत आपले स्थान निर्माण केले होते. त्यानंतर त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश करून संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने कार्य केले. नुकतेच काँग्रेस पक्षाने त्यांची पैठण विधानसभा मतदारसंघ निरीक्षक म्हणून नियुक्ती केली होती. दोन दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात काँग्रेसचे निरीक्षक म्हणून त्यांनी संभाव्य उमेदवारांची बैठक घेतली होती स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत ते इसोली जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढणार होते. बुधवारी सायंकाळी मुंबईवरून परत येत असताना कसारा घाटात ही दुर्घटना घडली

डॉ. सत्येंद्र भुसारी यांच्या अपघाताची माहिती माजी आमदार राहुल बोंद्रे मुंबईहून घटनास्थळी रवाना झाले. उदयनगरचे सरपंच मनोज लाहुडकर यांनीही तत्काळ तेथे पोहोचून परिस्थितीची माहिती घेतली.

चिखलीच्या आमदार श्वेता महाले-पाटील यांचे पती विद्याधर महाले यांनी स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधून आवश्यक मदतीच्या सूचना दिल्या. डॉ. भुसारी यांच्या निधनाने चिखली तालुका तसेच संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात शोककळा पसरली असून त्यांच्या योगदानाची आठवण सर्वच क्षेत्रांत कायम राहील, अशी भावना विविध नेत्यांनी व्यक्त केली आहे.

### पत्नीने प्रियकराच्या मदतीने

# पतीला संपवले

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १३ :

बडनेरा हद्दीतील भानखेडा रोडजवळ जंगलात आढळलेल्या अज्ञात व्यक्तीच्या हत्येचे गूढ अवघ्या आठ तासांत उलगडण्यात अमरावती शहर गुन्हे शाखेला यश आले आहे. अनैतिक संबंधांच्या आड येणाऱ्या पतीची, पत्नीनेच प्रियकराच्या मदतीने कट रचून निर्घृण हत्या केल्याचे तपासात उघड झाले आहे.

प्रमोद बकाराम भलावी (४२, रा. कारला, हल्ली रा. अंजनगावबारी) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी मृत प्रमोदची पत्नी छाया आणि तिचा प्रियकर विश्वांबर दिगांबर मांजरे (३९, रा. विश्वी, जि. बुलडाणा) या दोघांना अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी (दि. १२) सायंकाळी आठ वाजण्याच्या सुमारास हनुमान गढी ते भानखेडा रोडवरील जंगलात एका युवकाचा मृतदेह आढळला होता. डोक्यात दगड टाकून चेहरा विद्रूप केल्यामुळे त्याची ओळख पटवणे कठीण होते. घटनास्थळी पोलिसांना एक मोटारसायकल आढळली. हाच धागा पकडून पोलिसांनी तपास सुरू केला. ही मोटारसायकल टवलार (ता. अचलपूर) येथील एका व्यक्तीच्या नावे असली तरी, ती काही दिवसांपूर्वीच प्रमोद भलावी याला विकल्याची माहिती मिळाली. तो सध्या दिवाळीपासून अंजनगावबारी येथे पत्नी छायासोबत राहत असल्याचे समजले. पथकाने पत्नी छायाकडे चौकशी केली असता, तिने उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. यामुळे पोलिसांचा संशय बळावला. तपासात छायाचे विश्वांबर मांजरे नावाच्या व्यक्तीसोबत अनैतिक प्रेमसंबंध असल्याची माहिती मिळाली. गुन्हे शाखेचे पथक तातडीने बुलडाणा जिल्ह्यातील विश्वी गावी रवाना झाले व गुरुवारी आरोपी विश्वांबरला ताब्यात घेतले.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योजक श्लोका अंबानी यांच्या पुढाकाराने

# गडचिरोलीत 'सोलर शाळा' उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. १३ :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि अंबानी उद्योग समूहातील सदस्य व 'रोझी ब्लू फाउंडेशन'च्या संचालिका श्लोका अंबानी यांच्या सामाजिक सहकार्यातून नक्षलग्रस्त व दुर्गम गडचिरोली जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या सौर ऊर्जीकरणाचा महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रोझी ब्लू फाऊंडेशन आणि त्यांच्या स्वयंसेवा प्लॅटफॉर्म 'कनेक्ट फॉर'च्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांचे विशेष कौतुक केले. 'कनेक्ट फॉर'च्या संस्थापक श्लोका अंबानी आणि सह-संस्थापक मानिती शाह यांनी गडचिरोली जिल्ह्यावर विशेष लक्ष केंद्रित करावे, अशी सूचना स्वतः मुख्यमंत्र्यांनी दिली होती. अंबानी उद्योग समूहातील सदस्य श्लोका अंबानी यांनी नीती आयोगाने आकांक्षित जिल्हा म्हणून घोषित केलेल्या गडचिरोलीमध्ये शैक्षणिक पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी घेतलेला पुढाकार अत्यंत प्रशंसनीय असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून प्रकल्पाला सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनंतर गडचिरोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे यांनी ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी 'सोलर शाळा प्रकल्पा'अंतर्गत रोझी ब्लू फाऊंडेशनला काम करण्यास मंजुरी दिली. पहिल्या टप्प्यात फाऊंडेशनने धानोरा तालुक्यातील दहा जिल्हा परिषद शाळांमध्ये सौर ऊर्जेवर आधारित युनिट्स उपलब्ध करून देण्याचा उपक्रम हाती घेतला. यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धानोरा, मुसक्या, सालेभट्टी, रांगी, निमगाव, दुडमला, मुरूमगाव, बन्धोना, तसेच जिल्हा परिषद हायस्कूल धानोरा आणि मोहली या शाळांचा समावेश आहे.

या प्रकल्पामुळे शाळांमधील अध्यापन व डिजिटल शैक्षणिक उपक्रमांना वीज पुरवठ्यावरील अवलंबन कमी होऊन अखंड सुविधा मिळेल व या शाळांमधील सुमारे १४७० विद्यार्थ्यांना याचा थेट लाभ होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि 'रोझी ब्लू फाउंडेशन'च्या संचालिका श्लोका अंबानी यांच्या संयुक्त सहकार्यातुन सुरू झालेला सोलर शाळा प्रकल्प हा गडचिरोली जिल्ह्यातील शिक्षण प्रणालीसाठी टिकाऊ, स्वच्छ आणि विश्वसनीय ऊर्जा पुरविणारा नवा आदर्श ठरत आहे.